मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

**अंक ३३ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च १९९८**

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## सेवा व्यवसाय

**- प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ**

आपल्याकडे जागतीकरणाच्या कालावधीत स्वयंरोजगार किंवा सेवा व्यवसायास खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. एकप्रकारे ह्यास 'सेवा क्रांती' म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. कारण दिवसेंदिवस उत्पादक उद्योगांपेक्षाही जास्त महत्व सेवा उद्योगांना येत आहे. हे सेवा व्यवसाय फायदेशीर तर आहेतच; परंतु मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करीत आहेत.

अशा सेवा व्यवसायांना उत्पादक उद्योगाच्या मानाने कमी स्थिर भांडवल लागते. **अर्थपुरवठा हा असा एक महत्वाचा सेवा उद्योग.** ह्या कार्यात सर्व प्रकारच्या सरकारी व सहकारी बँकांचा समावेश होऊ शकतो. परंतु खाजगी बँकेची अजून व्हावी तशी प्रगती झालेली दिसत नाही. अशाप्रकारचा व्यवसाय हा फार मोठ्या प्रमाणात भांडवलाचा व चांगल्या नोकरदारांवर अवलंबून आहे.

**दुसरा मोठा उद्योग म्हणजे हॉटेल्स.** ह्यासाठी लागणारी भांडवल उभारणी फार मोठी असते व सुरू होई पर्यंत अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ मोठ्या शहरांतील जागांच्या किंमती, जागा ताब्यात मिळवण्यासाठी येणाऱ्या अडचणी, सरकारी टॅक्सचा फार मोठा बोजा घ्यावा लागतो, तांत्रिक व प्रशिक्षित लोकांचा अभाव व शेवटी रस्ते, पाणी, इलेक्ट्रिसिटी, ट्रान्स्पोर्ट व कम्युनिकेशन ह्या सुविधांची अडचण.

सध्या **पर्यटनाशी निगडित म्हणजे बस सेवा, कम्युनिकेशन सेवा** ह्यांची फार मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. रेल्वे व एस्. टी. नंतर खाजगी बस सेवांचे तर पेव फुटले आहे. ह्या बसेसवर आर्थिक मदत फार चांगल्याप्रकारे मिळत असल्यामुळे व गुंतवणुकीच्या दृष्टीने ह्यावरील फायदा हा फार चांगला असल्यामुळे बस घेणे व ती एखाद्या ट्रॅव्हल कंपनीला चालवायला देणे हे फारच सोईचे झाले आहे. ह्याचे जोडीने पी. सी. ओ व एस. टी. डी. बुथचे तर फार मोठे पीकच आले आहे. आता भारताच्या अगदी कानाकोपऱ्यात ही सुविधा आपणास उपलब्ध आहे व नवीन व्यवसायिक ह्याचा फायदा घेत आहेत.

ह्याबरोबर **टूर व ट्रॅव्हल्स कंपनी काढणे व लहान लहान व मोठ्या ट्रीप्स काढणे** तसेच ट्रॅव्हल एजंसी काढून रेल्वे, बस, विमान ह्यांची तिकीटे व हॉटेल्स बुकिंग करून देणे हे एक फार मोठे कामच झाले आहे. स्वतः लाईनीत उभे रहाण्यापेक्षा अशा व्यवसायिकाची मदत घेणे हे आता नित्याचे झाले आहे.

पुर्वीच्या मानाने पगारांचे प्रमाण बऱ्यापैकी वाढल्यामुळे लोकांच्या हातात थोडा जास्त पैसा शिल्लक राहू लागला आहे. त्या दृष्टीने **गुंतवणूक मार्गदर्शनपर सेवा** ह्यास खूप महत्त्व निर्माण झाले आहे. वेगवेगळ्या गुंतवणुकीच्या योजनांची एकत्रित माहिती मिळणे व कोठे, कधी व कशी गुंतवणुक करावी ह्याचा सल्ला घेणे क्रमप्राप्त झाले आहे. तरी हा एक व्यवसाय करण्यासारखा आहे. त्यामध्ये शेअर्स, डिपोझिट, बॉण्ड ह्यांचा समावेश होऊ शकतो. ☆☆☆

***(पर्यटन, ट्रॅव्हल व टुरिझम, गुंतवणूक मार्गदर्शन, एस. टी. डी. व पी. सी. ओ. अशा व्यवसायांत आजहि अनेक कुलबांधव कार्यरत आहेत.त्यांनी आपली माहिती व अनुभव कळवावे. त्यांना हितगुजमधून प्रसिद्धी दिल्यास इतरांना मार्गदर्शन नक्कीच मिळू शकेल. - संपादक)***

**१०वी, १२वी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशासाठी प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा!**

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# हितगुज कार्यालयात धो धो पाऊस - अभिनंदनांचा!

***हितगुजच्या रत्नागिरी अधिवेशन विशेषांकाचे वाचकांनी 'न भूतो न भविष्यति' असे स्वागत केले. एका वाचकाने तर सांगितले की स्टँडवर India Today सारखे अंक असतात त्यांच्या तोडीस तोड अंक आहे. अनेकांनी फोन केले. काहींनी तर अंक हातात पडताच परगावहूनही Instant कौतुक केले. अंकाचे कौतुक करणाऱ्या सर्व कुलबांधवांचे आभार. याचे मोठे श्रेय 'अर्थपुरवठा' करणाऱ्या जाहिरातदारांचे. मी तो केवळ निमित्तमात्र. चोखंदळ वाचकांच्या काही बोलक्या प्रतिक्रिया येथे दिल्या आहेत. - संपादक***

"अंकाची सजावट, मांडणी अत्युत्कृष्ट. संपादन कौशल्य ठायी ठायी दृग्गोचर होते. अंकाचे प्रत्येक पृष्ठ काहीतरी विशेष दाखवण्यासाठी, मनात रुजवण्यासाठी आतुर होते. आपले कुलबांधव किती विविध क्षेत्रात नावलौकिक कमावून आहेत याचे दर्शन अंक वाचून होते. त्यातील काहींनी मार्गदर्शनासाठी, सहाय्यासाठी पुढे केलेला हात पकडून निदान काही जण जरी उद्योग प्रवण झाले तरी ते हितगुजचे मोठेच यश ठरेल. ते मासिक स्वरूपात प्रसिद्ध होण्याइतकी आपले प्रतिष्ठानची सर्वार्थाने ताकद वाढो ही सदिच्छा."

**- भास्कर नरहर** (पृ. ४६), रत्नागिरी.

"अंकाची मांडणी उत्कृष्ट आहे. एखाद्या मोठ्या मासिकाच्या संपादकाला आवश्यक असणारे सर्व गुण हितगुजच्या संपादनात असल्याचे जाणवते. हितगुज या मुखपत्राचे हितगुज मासिकात रूपांतर होण्याचे दिवस जवळ आल्यासारखे दिसतात."

**- विठ्ठल महादेव,** (पृ. २३५), सांगली.

"संमेलन विशेषांक एकदम देखणा. संमेलनाला हजर राहू न शकणाऱ्या आमच्यासारख्यांना अंक वाचून संमेलनाचे दोन दिवस आमच्या कुलबांधवांसमवेत प्रत्यक्ष संमेलन पहात आहो - जगतो आहो, असे वाटले.... मराठे कुलांतून तीन-तीन पिढ्यांतून चालत आलेल्या यशस्वी व्यावसायिकांच्या हकिकती वाचून खूप माहिती मिळाली. पुढील पिढ्यांना त्यांची माहिती दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल. संमेलन विशेषांक साहित्यिक दृष्टीनेही छान वाटला. कोकण रेल्वेचा मलपृष्ठावर दिलेला नकाशा अत्यंत उपयुक्त व संग्राह्य वाटला."

**- सौ. निशा आणि भालचंद्र कृष्ण** (पृ. ४२७), कोल्हापूर.

"हितगुजचा 'झळाळणारा' रत्नागिरी संमेलन विशेषांक मिळाला. आमच्याकडील जे कुटुंब सदस्य संमेलनाला येऊ शकले नाहीत त्यांना संपूर्ण संमेलनाची 'आंखो देखी' खबर या अंकामुळे प्राप्त झाली."

**- अनंत दत्तात्रय आणि संजय अनंत** (पृ. ३६३), नाशिक.

"डिसेंबर ९७ चा अंक फारच उत्कृष्ट. संमेलन वृत्तांत वाचून पुन्हा संमेलनातील भेटीगाठींना उजळा मिळाला."

**- कु. संध्या सदानंद खांबेटे** (पृ. ६९६), ठाणे.

"रत्नागिरी संमेलन विशेषांक अत्यंत चांगला. मराठे कुलबांधवांच्या रत्नांच्या खाणीतील काही चमकदार रत्नांची ओळख करून दिल्याबद्दल संपादकांचे आभार. कोकण रेल्वेची पाहणी-आखणी आपल्या कुलबांधवांची आहे हे वाचून अभिमान वाटला."

**- सौ. जयश्री विनायक** (पृ. ३०७), डोंबिवली.

" हितगुज ३२व्या अंकाचे रूपरंग पाहून फार आनंद वाटला. एक गोष्ट मात्र खटकली. हा अंक इथे मिळण्यास रु. ९ तिकीट खर्च आला. हा खर्च प्रतिष्ठानला परवडणारा नाही."

**- लक्ष्मण गणेश,** पुणे.

***(आम्हालाही खर्च जास्त वाटला. शक्य तितके अंक समक्ष वाटले. पुण्यांत ५०-६० अंक असे वाटले. लांबलांबचे पोस्टाने पाठवावे लागले - संपादक)***

"या अंकातील संमेलनाच्या वृत्तान्तावरून प्रत्यक्ष रत्नागिरीलाच उपस्थित असल्याचे वाटले. संमेलन वृत्त फारच मुद्देसूद व माहितीपूर्ण. विभाग १, ३, ४ मधील माहिती उपयुक्त. खरोखरच संग्रहणीय अंक."

**- चिंतामण त्र्यंबक** (पृ. २४८), कळवा, ठाणे.

" हितगुज रत्नागिरी संमेलन विशेषांक वाचनीय. माहिती उपयुक्त."

**- बळवंत गणेश विद्वांस** (पृ. ६४५), मालाड.

"रत्नागिरी संमेलन विशेषांक पाहून आणि वाचून समाधान वाटले. सभासदांविषयींची समग्र माहिती, त्यांनी लिहिलेले लेख आवडले. 'एकमेकां साह्य करूं' हे सदर म्हणजे कुलबांधवांपैकी गरजूंना वरदानच आहे."

**- सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ. ६५८) मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत

"रत्नागिरी संमेलन विशेषांक सर्वच बाबतीत छान झाला आहे. मांडणी, छायाचित्रे, जुळणी या सर्वामुळे अंकाची शोभा वाढली आहे. संपादकांसह सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन. 'काणी सोंव्वाराची' मधील भाषेवर गोवा कोकणी भाषेचा पगडा जास्त आहे. माझ्या मते काही उच्चार फार क्लिष्ट केले आहेत. कर्नाटकातील कुलबांधव कदाचित यावर जास्त प्रकाश टाकू शकतील."

**- वसंत रावजी** (पृ. ११७) खुडीपाट, जि. सिंधुदुर्ग

***(यांतल्या भाषेवर गोव्यातल्या चितपावनीचा पगडा आहे हे खरे आहे. कारण मी स्वत: अजून ही भाषा बोलतो अर्थात गोव्यांत घरी गेलो की. रत्नागिरीत वा कर्नाटकात वेगळ्या पद्धतीने ती बोलली जाते. कर्नाटकातले कुलबांधव रत्नागिरीत भेटले असता त्यांची बोलण्याची पद्धत वेगळी, काही शब्दही वेगळे असल्याचे जाणवले. चितपावनी ही बोलीभाषाच आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी बोलली जाणारी भाषा बरोबर; कोणाचीच चुकीची म्हणता येणार नाही. चितपावनीचेच कशाला - कोल्हापूरची मराठी, पुण्याची मराठी, नागपूरची मराठी तरी सारखी असते का ? - संपादक)*** ☆☆☆



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ सभा**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी प्रतिष्ठानच्या कार्यालयांत कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. या दिवशी सायंकाळी ५ वाजता कोणीहि कुलबांधव पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येऊ शकतो.

डिसेंबर १९९७ ते फेब्रुवारी १९९८ या तिमाहीत १३ व २७ डिसेंबर, १० व २६ जानेवारी आणि १४ फेब्रुवारी अशा सभा झाल्या. २८ फेब्रुवारी रोजी लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस असल्यामुळे त्या दिवशी सभा घेण्यात आली नाही.

१० जानेवारीची सभा मुलुंड येथे 'हितगुज'चे संपादक लक्ष्मण शंकर (५२०) यांच्या निवासस्थानी तर जानेवारीतली २री सभा २४ ऐवजी २६ तारखेला वर्धापन दिन समारंभानिमित्त पुण्यात पुणे कार्यकारिणीसह संयुक्त सभा म्हणून घेण्यात आली. या सभेत पुण्यातील उद्योजक-व्यवसायिक-कुलबांधवांचा एक मेळावा एप्रिल १९९८ मधे घेण्याबाबत चर्चा झाली.

१४ फेब्रुवारीची सभा विश्वस्त व कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा म्हणून घेण्यात आली. या सभेत शिक्षण निधीतून देण्यात येणारे कर्ज सहाय्य वाढवण्याची व त्यासाठी शिक्षण निधीची रक्कम वाढवण्याची गरज, वैद्यकीय मदतीचे स्वरूप व कार्यपद्धती, विभागवार शाखा-उपशाखा वा प्रतिनिधी अशी काही व्यवस्था निर्माण करून कुलबांधवांमधील संपर्क व परस्पर सहकार्याची व्यवस्था अधिक प्रभावी करणे, उद्योग-व्यवसायांत, विशेषतः कमी भांडवल लागणाऱ्या सेवा उद्योगांत पदार्पण करण्यासाठी कुलबांधवांना प्रेरित करणे व सहाय्य करणे, हितगुजची वर्षातील अंकांची संख्या वाढवणे, कुलवृतांताचे अद्ययावतीकरण इ. बाबतीत मूलभूत धोरणविषयक चर्चा करण्यात आली.

तसेच पारितोषिक प्राप्त आदर्श मातेच्या निवडीलाही या सभेत मान्यता देण्यात आली आणि प्रतिष्ठानच्या माध्यमातून हे पारितोषिक प्रायोजित केल्याबद्दल 'ग.वि.'चेही आभार मानण्यात आले.

**आदर्श माता पारितोषिक**

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष गणेश विनायक (पृ.११५) यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ रु. १००० चे आदर्श माता पारितोषिक प्रतिवर्षी देण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्याबाबत मार्च व सप्टेंबर १९९७ च्या हितगुजमध्ये आवाहन करण्यात आले होते.




मालतीबाई व भाऊसाहेबांचा सत्कार करताना सुलभाताई व सुरेशभाऊ.

त्यानुसार **पांच आदर्श मातांची नांवे सुचविणारे ६ लेख** प्राप्त झाले. ते असे :

१) सौ. कमला वासुदेव ताम्हणकर, पेडणे, गोवा यांजकडून त्यांची आई श्रीमती राधाबाई बाळकृष्ण (पृ.५४१) यांचे बाबतचा लेख.

२) सौ. सुमन नारायण (पृ.१८), कल्याण यांचेकडून त्यांची पुतणी सौ. अरुंधती अशोक वाड (दत्तात्रय परशुराम यांची मुलगी उषा-पृ.१७) यांच्याबाबत लेख.

३) सौ. अर्चना अरुण कुलकर्णी, कोल्हापूर, यांजकडून त्यांची आई सौ. विद्या भालचंद्र (पृ. ४२७), कोल्हापूर यांचेबाबत लेख.

४) कु. प्राची प्रभाकर आणि सौ. प्रज्ञा पिटकर, नागपूर या दोघींकडून त्यांची आई सौ. प्रतिभा प्रभाकर (पृ.१०१), यांचेबाबतचे दोन लेख.

५) सौ. मंगला दत्तात्रय (पृ.९२), भाईंदर, जि. ठाणे यांचेकडून त्यांची मैत्रीण सौ. इंदिरा दिगंबर कुलकर्णी, मुलुंड, मुंबई यांचेबाबतचा लेख. (या मराठे परिवारांतल्या नाहीत)

नावे सुचविलेल्या सर्वच मातांचे कर्तृत्त्व आपापल्यापरीने वैशिष्ट्यपूर्ण होते. मात्र पारितोषिक एकच असल्यामुळे ते कोणाला द्यायचे याबाबतचा निर्णय या पारितोषिकाचे प्रायोजक 'ग.वि.' व त्यांच्या कर्तृत्ववान सुविद्य पत्नी यांनीच घ्यावा असे कार्यकारी मंडळाने ठरविले. आदर्श मातेबाबतचे आधी जाहीर केलेले निकष (हितगुज सप्टेंबर १९९७) लक्षांत घेऊन त्यांनी **श्रीमती राधाबाई बाळकृष्ण, गोवा यांची या पारितोषिकासाठी निवड केली** व ती कार्यकारी मंडळाने मान्य केली. त्यांच्या बाबतचा त्यांच्या मुलीचा लेख या अंकात छापला आहे. इतरहि मातांच्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बाबतचे तीन लेख संक्षिप्त स्वरूपात छापले आहेत.

राधाबाईंचे व त्यांचे नाव सुचविणाऱ्या त्यांच्या गुणग्राहक मुलीचे अभिनंदन. तसेच स्पर्धेला प्रतिसाद देणाऱ्या सर्वच कुल'भगिनींचे' आभार. एकाहि कुल'बांधवा'ला आपली आई आदर्श माता वाटली नाही असे समजावे काय?(!) सर्व लेख 'भगिनीं' कडूनच आले!!

**भाऊसाहेबांशी स्नेहमीलन १४.२.१९९८**

कुलवृत्तांताचे प्रमुख संपादक आणि प्रतिष्ठानच्या सुरवातीपासूनच्या सर्वच कार्याचे केंद्रबिंदु असणारे **विनायक गोपाळ (पृ. ६९) तथा भाऊसाहेब** आणि सौ. मालतीबाई सुमारे तीन वर्षाच्या अमेरिकेतील वास्तव्यानंतर फेब्रुवारीमध्ये महिनाभरासाठी मुंबईत येऊन गेले. त्यांच्याशी कुलबांधवांच्या स्नेहमीलनाचा कार्यक्रम १४-२-१९९८ रोजी मराठे उद्योग भवनात झाला. भाऊसाहेबांना भेटण्याच्या ओढीने सुमारे शंभर कुलबांधव यावेळी आवर्जून उपस्थित होते.

अमेरिकेतील समाजजीवन आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासंबंधी बोलताना भाऊसाहेब म्हणाले की स्त्री-पुरुष संबंध आणि कुटुंबातले परस्पर संबंध याबाबत आपल्या व अमेरिकन विचारसरणीत जमीन अस्माना इतके अंतर आहे. पुरुषाला आपल्या पत्नीशिवाय अन्य स्त्रियांचे आकर्षण आणि स्त्रीलाही आपल्या पतीशिवाय अन्य पुरुषांचे आकर्षण या



Marathe Pratishthan

गोष्टी नैसर्गिक मानल्या जातात; आपल्यासारख्या अनैतिक समजल्या जात नाहीत असे मिस्किलपणे सांगून पुढे लगेच त्यांनी खुलासा केला की याचा अर्थ सर्वत्र स्वैराचार बोकाळला आहे असे नव्हे. आपल्या इकडल्याप्रमाणेच कुटुंबात एकमेकांशी परस्परसंबंध असतात. फरक इतकाच की ते आपल्याप्रमाणे अति भावुक होत नाहीत; अधिक व्यवहारवादी असतात.

एखाद्या अमेरिकनाला विचारलेत की तुझे आई-वडील कुठे आहेत तर तो जरा वेळ डोके खाजवून निर्विकारपणे सांगेल की 'सहा महिन्यांपूर्वी ते अमुक ठिकाणी होते; आता नेमके कुठे आहेत माहीत नाही.' याही पुढची पायरी म्हणजे तुझी आई अथवा वडील वारले आहेत असे हजार-दीड हजार मैलांवरील गावातून फोनवर एखाद्याला सांगितले तर तो फोनवर बोलणाऱ्यालाच सांगायला कमी करणार नाही की "अमुक अमुक कंपनीला कळव. त्यांच्याशी मी पुढील सर्व व्यवस्था करण्याचा करार केलेला आहे."

माणसाला अखेरपर्यंत नीट जगता यावे अशी व्यवस्था सोशल सिक्युरीटीमार्फत तिकडे केली जाते. सीनियर सिटीझन हा समाजाचा महत्त्वाचा घटक मानला जातो. वृद्ध पती-पत्नी दोघांना दरमहा सुमारे २००० डॉलर एवढी रक्कम सुखाने जगण्यासाठी लागते असे ठरवून त्यापेक्षा कमी मिळकत असणाऱ्यांना 'सप्लिमेंटल इन्कम' म्हणून बाकीची रक्कम सोशल सिक्युरीटीमार्फत दिली जाते. तेथील वृद्धाश्रमातही केवळ राहण्याचीच नव्हे तर आजार-पाजार, मृत्यूनंतरची व्यवस्था या सर्व गोष्टींची योजना व तरतूद सुरवातीलाच करण्यात येते; 'प्रसंग आला तर पाहता येईल' असे म्हणत नाहीत.

**वर्धापनदिन २६.१.१९९८**

सालाबादप्रमाणे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन पुणे शाखेतर्फे २६ जानेवारी १९९८ रोजी सायंकाळी ४ ते ८ या वेळांत वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या हॉलमध्ये साजरा करण्यात आला. याचा वृत्तांत स्वतंत्रपणे छापला आहे.

## स्वयंउद्योजक मेळावे - चर्चासत्रे

स्वयंउद्योजकांचे मेळावे व चर्चासत्रे आयोजित करून कुलबांधवांना उद्योग-व्यवसायांत, विशेषतः सेवाव्यवसायांत स्वयं रोजगार निर्मितीला प्रोत्साहित करण्यावर येत्या वर्षभरात प्रतिष्ठानतर्फे भर देण्याचे ठरविण्यात आले आहे. या अंकाच्या मुखपृष्ठावरील प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ यांचे त्याबाबतचे विचार निश्चितच मार्गदर्शक आहेत.

मुंबईत अंधेरी व मुलुंड येथे या विषयाला चालना देण्यासाठी घेतलेल्या दोन चर्चासत्राचे अहवाल सप्टेंबर १९९७ च्या हितगुजमध्ये देण्यात आले आहेत. ऑक्टोबर १९९७ मधील रत्नागिरी अधिवेशनांतहि या विषयावर खास चर्चा झाली. तोही अहवाल डिसेंबर १९९७ च्या अंकात दिलेला आहे.

अशाच प्रकारचा एक मेळावा पुण्यात एप्रिल वा मे महिन्यांत घेण्याची तयारी चालू आहे. तसेच ठाण्यांतहि, विशेषतः १०वी व १२वीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा एप्रिल-मे मध्ये आयोजित करण्याचेहि प्रयत्न चालू आहेत.

उद्योग-व्यवसाय प्रवर्तन कार्यक्रमाला पूरक म्हणून **उद्योजक-व्यावसायिक कुलबांधवांची सूची** (डिरेक्टरी) तयार करायला हवी. पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर-सांगली-सातारा, मराठवाडा, विदर्भ या विभागांतून हे काम करण्याची **जबाबदारी घेण्यासाठी कुलबांधवांनी आपणहून प्रतिष्ठानशी संपर्क साधावा** असे आवाहन आहे.

## कुलवृत्तांताचे नूतनीकरण

कुलवृत्तांताची २री आवृत्ती प्रसिद्ध होऊन पाच वर्षांचा काळ लोटला आहे. त्यातील माहिती त्यापूर्वीच्या चार-पाच वर्षांची म्हणजे सुमारे १० वर्षापूर्वीची आहे. तसेच अनेक ठिकाणी ती अपूर्णही असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे कुलवृत्तांताचे नूतनीकरण करण्याचे काम हप्त्याहप्त्याने (घराणेवार) हातात घ्यावे आणि एकेका घराण्याची वा घराणे समूहाची अद्ययावत माहिती (कुलवृत्तांत आवृत्ती ३, खंड १, खंड २, ... याप्रमाणे) प्रसिद्ध करावी असे ठरविण्यात आले आहे. **आपापल्या घराण्यापुरते हे काम करण्याची जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या कुलबांधवांनी कृपया प्रतिष्ठानला कळवावे** म्हणजे त्याना पुढील कार्यवाहीबाबत कळविण्यात येईल. या कामाच्या **सुसूत्रीकरणाची जबाबदारी** घेण्याचे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष **श्री. सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ. ६७६) यांनी मान्य केले आहे.

## हितगुज

रत्नागिरी अधिवेशनाच्या निमित्ताने हितगुजच्या वर्गणीदार-वाढीला चालना मिळाली असून तहहयात वर्गणीदारांची संख्या सुमारे पावणेसातशेवर पोचली आहे. प्रतिष्ठानची सभासद संख्या साडेआठशे. मात्र हितगुज वर्गणीदार सुमारे फक्त पावणेसातशे. म्हणजे **सुमारे १७५ सभासद अजून हितगुजचे वर्गणीदार नाहीत.** त्यांनी हितगुज तहहयात वर्गणी (रु. २००) पाठवावी; तसेच **सर्वच कुलबांधवांनी आपापल्या माहेरवाशिणींनाहि हितगुजचे वर्गणीदार करावे.** म्हणजे ही संख्या १००० पर्यंत पोचणे शक्य होईल.

**हितगुज मासिक व्हावे** अशी अनेकांची मागणी आहे. **याबाबत एक वेगळा** विचार मांडणारे पत्रहि प्रथमच आले आहे. याबाबतहि व्यापक प्रमाणात विचारांचे आदान-प्रदान व्हायला हवे असे वाटते. पत्र असे आहे -

'हितगुज आतां खरोखरीच त्रैमासिक झाले आहे. त्यामुळे प्रतिष्ठानचे वृत्तहि जवळजवळ सर्व ठिकाणी मराठे परिवारांत पोचत आहे. उत्तमपैकी अंक निघावा यासाठी लक्ष्मणरावांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा सतत चालू असल्याचे दिसून येते."

'त्रैमासिकाऐवजी मासिक वा द्वैमासिक काढण्याबाबत विचार होत आहे. माझ्या मते सध्याची पृष्ठसंख्या, तसेच कालावधी (पीरियॉडिसिटी) योग्य आहे. प्रतिष्ठानचे कार्य व परिवारासंबंधित वृत्त यावरच मुख्यतः भर असावा. जास्त अंक काढल्यास content कमी व इतर भारूड (किंवा साहित्य) जास्त होण्याची शक्यता (व खर्चही) वाढेल. Dilution मुळे Impact होण्याची शक्यता कमी होईल."

**- डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ. २८४), घाटकोपर.

तहहयात वर्गणीच्या व्याजातून वर्षाला ३ अंकांच्या (१६ पानी) खर्च जेमतेम भागू शकतो. जास्तीच्या अंकाच्या खर्चासाठी प्रतिवर्षी सुमारे ५० हजार रुपये जाहिरात वा देणगी रूपाने मिळाल्यास दरमहा अंक काढणे शक्य होईल - आर्थिक दृष्ट्या.



Marathe Pratishthan

त्याबरोबरच संपादकीय कामातही - छपाई, अक्षरजुळणी, (D.T.P.), मजकुराची मांडणी, सजावट इ. कामांची माहिती असणाऱ्या कुलबांधवांचाही सहभाग मिळायला हवा. **अशा तऱ्हेचे संपादकीय सहकार्य करू इच्छिणाऱ्या कुलबांधवांनी कृपया आपण होऊन संपादक हितगुज यांना लिहावे.**

## शिक्षण निधी

प्रतिष्ठानकडील शिक्षण निधी केवळ लाखभर रुपये आहे. अलिकडे वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण खर्चिक झाले आहे. सहाय्यासाठी मागणीही वाढते आहे. अशा कुलबांधवांना भरीव मदत होण्याच्या दृष्टीने प्रत्येकी २०-२५ हजार रुपये तरी परतफेडीचे कर्ज म्हणून देता यायला हवे. दरवर्षी ४-५ कुलबांधवांना असे सहाय्य करायचे म्हटले तरी एक लाख रुपये लागतील. अशी रक्कम ६-७ वर्षांनी परत येईल असे मानले तर सुरवातीची ६-७ वर्षे लाख लाख रुपये प्रमाणे निधीवाढीतूनच द्यायला लागतील. यासाठी **कुलबांधवांनी शिक्षण निधीसाठी मोठ्या प्रमाणात देणग्या द्यायला पुढे यावे असे आवाहन आहे.**

## कायम निधी

प्रतिष्ठानचा खर्च दिवसेंदिवस वाढता आहे. वाढत्या कार्याबरोबर तो वाढणे साहजिक आहे. कायम निधीच्या व्याजातून असा खर्च भागवायचा तर आज सुमारे १ लाख कायम निधीचे व्याज येते जेमतेम दहा-बारा हजार. ८५० सभासदांना एक पत्र पाठवायचे म्हटले तर केवळ टपालखर्चच होतो. रु. १७००. दरमहा खर्चासाठी पाच-सहा हजार रुपये तरी उपलब्ध व्हायला हवे. या दृष्टीने कायम निधीही ५-६ लाखांनी वाढायला हवा. **यासाठीही कुलबांधवांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन आहे.**

## स्थानिक प्रतिनिधी

प्रतिष्ठानच्या कामाला वेग येण्याच्या दृष्टीने मुंबई-पुणे यासारख्या महानगरांच्या निरनिराळ्या भागांत आणि अन्य गांवागावांत प्रतिष्ठानचे काम करण्यासाठी प्रतिनिधी-व्यवस्था निर्माण व्हायला हवी. **आपापल्या भागात प्रतिष्ठानचे प्रतिनिधी म्हणून काम करू इच्छिणाऱ्यांनी कृपया प्रतिष्ठानला लिहावे ही विनंती.** ☆☆☆

## चित्पावन कॉन्फरन्स
## २६ ते २८ एप्रिल १९९८

दि. २६, २७, २८ एप्रिल १९९८ रोजी दुर्ग, ता. कारकल, जि. उडपी येथे चित्पावन कॉन्फरन्स होणार आहे.

कर्नाटकातल्या उडपी जिल्ह्यातले पाच कुलबांधव रत्नागिरी अधिवेशनाला आले होते. (पहा हितगुज, डिसेंबर १९९७, पृ. २५) त्यांनी मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांना कॉन्फरन्सचे निमंत्रण पाठवले आहे.

इच्छुकांनी प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष **सी. गो. खांबेटे, अंधेरी,** मुंबई, (फोन ८२०६९९४) **यांच्याशी संपर्क साधावा.**

---

# १९व्या वर्धापनदिन समारंभाचा वृतांत

**- प्रमोद विष्णु (पृ. ५१३), पुणे**

मराठे प्रतिष्ठानचा १९ वा वर्धापनदिन प्रजासत्ताकदिनी मोठ्या उत्साहात वेदशास्त्रोत्तेजक सभागृह पुणे येथे संपन्न झाला. सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशीच कु. आरतीने काढलेली सुंदर रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. कार्यक्रम ठीक ४.३० वा. सुरू झाला. व्यासपीठावर श्री. बापूसाहेब, श्री. सुरेशभाऊ, श्री. लक्ष्मणराव, श्री. व्ही. के. मराठे व श्री. खांबेटे होते. दरवर्षीप्रमाणे आपल्या ओघवत्या शैलीत सौ. नीलांबरी मराठे यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर लगेचच सौ. अनुराधा मराठे यांनी आपल्या सुरेल आवाजात म्हटलेल्या 'ओम नमोजी आद्या' ह्या गणेशस्तवनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. प्रथम श्री. सुरेशभाऊ व श्री. बापूसाहेबांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.

नंतरचा कार्यक्रम होता मान्यवरांचे सत्कार. अखिल भारतीय प्रिंटर्स आणि पॅकेजर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल **श्री. सुरेशभाऊंचा** कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. बापूसाहेबांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी ह्या क्षेत्रात घेतलेले अथक परिश्रम व सचोटीने केलेले कार्य ह्यामुळेच त्यांना हे मानाचे पद प्राप्त झाल्याचे श्री. लक्ष्मणरावांनी सांगितले. **श्री. व्ही. के. मराठे,** प्रतिष्ठानचे कार्यवाह ह्यांचा, त्यांनी मराठे प्रतिष्ठानच्या कार्यात केलेल्या बहुमोल योगदानासाठी, **सौ. उज्वला मराठे** ह्यांचा त्यांची पिंपरी, चिंचवड प्राधिकरणाच्या समितीवर निवड झाल्याबद्दल तसेच त्यांनी केलेल्या Telco गृहिणी संस्थेच्या कार्यासाठी, तसेच मराठे प्रतिष्ठानच्या आणि पुणे शाखेच्या कार्यासाठी घेत असलेल्या अथक परिश्रमासाठी **सौ. नीलांबरी मराठे** यांचाही शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रवेशद्वारापाशी रांगोळी सजावट करणारे आणि कार्यक्रम सादर करणारे सर्व कलाकार, त्यांना साथ करणारे तबला-पेटी वादक, सर्व कार्यक्रम श्रोत्यांपर्यंत लाऊडस्पिकरवरून पोचवणारे श्री. खांबेटे आणि कार्यक्रमाची पत्रे लिहिण्यांत सहकार्य करणारे सर्वश्री कमलाकर जाईल, विजय मराठे, मुकुंद मराठे आणि सौ. मुक्ता श्रीखंडे या सर्वांचा श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यांत आला.

त्यानंतर सत्कारार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री. सुरेशभाऊंनी श्री. अण्णासाहेब व श्री. अरुणराव हे पुणे शाखेचे आधारस्तंभ असल्याचे सांगून स्वयंरोजगारासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्याचे आवाहन केले त्यासाठी नियमित चर्चासत्रे, मेळावे व मार्गदर्शन आयोजित करण्यात येत असल्याचे पण सांगितले. त्याप्रमाणे एप्रिलमध्ये पुण्यात व्यावसायिकांचा मेळावा आयोजित करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री. लक्ष्मणरावांनी 'हितगुज' हे उत्कृष्ट संपर्क माध्यम असून, वर्गणीदार वाढवि यासाठी सर्वांनीच प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. हितगुज मध्ये प्रसिद्ध करण्यासाठी निरनिराळे लेख व उपयुक्त माहिती पाठवून सहकार्य करण्याचेहि त्यांनी आवाहन केले.

Marathe Pratishthan

श्री. खांबेटे ह्यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले. तसेच त्यांनी प्रतिष्ठानद्वारे दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय/शैक्षणिक मदतीचीही माहिती दिली.

श्री. व्ही. के. मराठे यांनी आपल्या भाषणात सांगितले की इतर घराण्यांचे कुलवृत्तांत प्रसिद्ध होणे त्यापलिकडे काहीही कार्य झालेले नाही. परंतु मराठे प्रतिष्ठान मात्र सदोदित नवीन नवीन कार्यक्षेत्रात जोमाने काम करीत असून त्यासाठी त्यांनी सर्वांना योगदान व सहकार्य देण्याचे आवाहन केले.

नंतर जवळजवळ १४ व्यक्तींनी आपापल्या व्यवसायांचा परिचय करून दिल्यानंतर सामोसा व बटाटेवडा अशा अल्पोपहार व चहापानासाठी मध्यंतर झाले. मध्यंतरानंतर **करमणुकीच्या कार्यक्रमाला** सुरवात झाली. **सौ. वैशाली पाटणकर** (मराठ्यांची माहेरवाशीण) कार्यक्रम सादर करण्यासाठी मुद्दाम बीडहून आली होती. तिच्या भावगीत गायनाचा कार्यक्रम सुश्राव्य झाला. त्यानंतर **पुण्याचे धनंजय मराठेंनी** राग बागेश्री मधील एक ख्याल सादर केला व त्यानंतर एक भजन सादर केले. हाही कार्यक्रम उपस्थितांची दाद घेऊन गेला. वेळेअभावी **कु. गायत्री जोशीला** फक्त दोनच गीते सादर करता आली.

यानंतर रत्नागिरी संमेलनाची व्हिडीओ कॅसेट दाखविण्यात आली. परंतु उशीर झाल्यामुळे ही कॅसेट पाहण्यासाठी उपस्थितांची संख्या अगदीच अल्प उरली होती. वेळेअभावी ही कॅसेट धावती दाखवल्यामुळे त्या कार्यक्रमाचा खरा आस्वाद घेता आला नाही.

☆☆☆

## इस्टंट प्रतिसाद

पुढील वर्षीच्या वर्धापनदिन कार्यक्रमाच्या अल्पोपहार खर्चासाठी देणग्या देण्याच्या आवाहनानुसार सौ. प्रमिला लक्ष्मण मराठे यांनी रु. ५०० चा चेक आणून दिला आहे आणि श्री. विष्णू रामचंद्र मराठे यांनी ५०१ रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे असे सौ. नीलांबरी मराठे यांनी कळविले आहे. त्वरित प्रतिसादाबद्दल आभार. **- संपादक**

# सभासद वृत्त

## सुरेशभाऊ - राष्ट्रीय पातळीवर



प्रतिष्ठानचे **अध्यक्ष सुरेश सखाराम** (पृ. ३९९) स्विफ्टस् लि. चे कार्यकारी संचालक, यांची इंडियन प्रिंटिंग, पॅकेजिंग अँड अॅलाईड मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (IPAMA) अध्यक्षपदी इपामाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सभेत सर्वानुमते निवड झाली. सर्व मराठे परिवारातर्फे सुरेशभाऊंचे अभिनंदन. मुद्रणक्षेत्रांतल्या आंतरराष्ट्रीय संस्था/संघटनेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधीहि त्यांना लाभो ही शुभेच्छा.

## 'किरात'चा अमृतमहोत्सव शुभारंभ

श्रीधर केशव (पृ. ३९६) यांच्या वेंगुर्ले येथील साप्ताहिक 'किरात'चे जानेवारी १९९८ मध्ये ७५ व्या वर्षात पदार्पण केले. मुंबईत दामोदर हॉल, परळ येथे ३.१.१९८८ रोजी अमृतमहोत्सवी वर्षाचा शुभारंभ सोहळा व वर्षारंभ विशेषांकाचे प्रकाशन असा कार्यक्रम पार पडला. हे 'किरात'च्या वाचक-हितचिंतकांचे जणू स्नेहसंमेलनच होते.

वेंगुर्ल्यासारख्या तालुक्याच्या ठिकाणी सतत ७५ वर्षे एक मराठी साप्ताहिक यशस्वीपणे चालवून मराठ्यांच्या तीन पिढ्यांनी दाखवलेली कर्तबगारी निश्चितच कौतुकास्पद. विशेष म्हणजे या समारंभात प्रचलित संपादक **श्रीधर केशव** यांचा मुलगा **कुमार शशांक** वय १४ हाहि ज्या तऱ्हेने जमलेल्या प्रेक्षकवर्गाच्या सोयी-सुविधांकडे लक्ष देत होता. त्यावरून चौथ्या पिढीतही 'किरात'ची चढत्या श्रेणीने भरभराट होईल याची जणू ग्वाहीच मिळत होती.

## निवृत्त अभियंता मंडळाचे अध्यक्ष वि. म. मराठे

सांगली येथे स्थापन झालेल्या निवृत्त अभियंता मंडळाच्या अध्यक्षपदी **विठ्ठल महादेव** (पृ. २३५), निवृत्त कार्यकारी अभियंता, यांची एकमताने निवड झाली. आपल्या ज्ञानाचा समाजाला उपयोग करून देण्याच्या उद्देशाने या मंडळाची स्थापना झाली आहे.

'वि. म.' सांगली येथे मराठे प्रतिष्ठानचे कार्य म्हणून वधु-वर माहिती केंद्र चालवतात. त्याशिवाय वृत्तपत्रे व नियतकालिकांत ते तांत्रिक विषयांवर व ललित लेखनही करतात. हितगुज डिसेंबर १९९७ अंकातली त्यांची कथा 'जीवनधारा' वाचकांच्या स्मरणात असेलच.

मराठे परिवारातर्फे 'वि. म.' यांचे अभिनंदन!

## उत्कृष्ट भालाईत हरि कृष्ण

**बेळगावमधील प्रतिष्ठानचे सदस्य हरि कृष्ण** (पृ. ४२७) यांनी बंगलोर येथे मार्च १९९८ मध्ये झालेल्या १९व्या व्हेटरन्स अॅथलेटिक चँपियनशिप स्पर्धेत ७० वर्षांवरील गटात खालीलप्रमाणे तीन पारितोषिके मिळवली -

१. भाला फेक - प्रथम क्रमांक (२५.५४ मीटर)
२. थाळी फेक - द्वितीय क्रमांक (२२.९४ मीटर)
३. गोळा फेक - तृतीय क्रमांक (८.२५ मीटर)

एप्रिलमध्ये होणाऱ्या नॅशनल चँपियनशिप स्पर्धेत कर्नाटक संघात हरि कृष्ण यांचा समावेश झाला आहे. तिथेहि असेच उज्ज्वल यश मिळो अशा सर्व मराठे कुटुंबीयांच्या शुभेच्छा.

## पदोन्नती

१. मराठे प्रतिष्ठानच्या **कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रमोद कृष्ण** (पृ. ३७६), भाभा अणुसंशोधन केंद्रातले सायंटिफिक ऑफिसर यांना नुकतीच 'सी' ग्रेड मधून 'डी' ग्रेड मध्ये पदोन्नती मिळाली. मराठे परिवारातर्फे अभिनंदन !

२. प्रतिष्ठानचे **डोंबिवली येथील सभासद सुरेश गोविंद** (पृ. ८७) यांना युनायटेड वेस्टर्न बँकेत १.१२.१९९७ पासुन स्पेशल असिस्टंट या पदावर पदोन्नती मिळाली. ते युनायटेड वेस्टर्न बँक कर्मचारी संस्थेचे ऑर्गनायझिंग सेक्रेटरी आहेत. मराठे परिवारातर्फे अभिनंदन !

३. घाटकोपर, मुंबई येथील **प्रतिष्ठानचे सदस्य अनंत सदाशिव (पृ. ८७) यांची पत्नी सौ. अश्विनी** हिला युनायटेड वेस्टर्न बँकेत १.९.१९९७ पासून अधिकारी या पदावर बढती मिळाली. सौ. अश्विनीचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन!



Marathe Pratishthan



## माधवी मराठे

सांगली येथील कुलबांधव **कै. विश्वनाथ पुरुषोत्तम** (पृ. ४५८) **याची मुलगी माधवी** हिने नोव्हेंबर ९७ मध्ये कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यांत आलेल्या बी. एच्. एम्. एस्. परीक्षेत पहिला क्रमांक मिळवला. या उज्ज्वल यशाबद्दल मराठे परिवारातर्फे कुमारी माधवीचे अभिनंदन!

## नेत्रशिबिर ऑर्गनायझर व्ही. एम्. मराठे

मराठे **प्रतिष्ठानचे सभासद विनायक महादेव** (पृ. २२९) यांनी मदुराई येथील अरविंद आय् हॉस्पिटलमध्ये कँप ऑर्गनायझिंग प्रशिक्षण वर्ग यशस्वीपणे पूर्ण केला. ते परळ मुंबई येथील बचुअली हॉस्पिटलच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसमध्ये काम करतात.

नेत्र शस्त्रक्रिया वा अन्य वैद्यकीय स्वरूपाच्या कोणत्याही कामासाठी कुलबांधवांनी त्यांच्याशी ११ ते ५.३० या वेळात संपर्क साधावा असे त्यांनी आवर्जून कळविले आहे.

## प्रियरंजन - प्रज्ञाशोध परीक्षेत प्रथम

पणजी, गोवा येथील कुलबांधव **आनंद राजाराम (पृ. ११५) यांचा मुलगा प्रियरंजन**, इ. ८वी, हा ग्रामीण प्रज्ञा शोध १९९७ या परीक्षेत ९२.७% गुण मिळवून सबंध गोवा राज्यांत पहिला आला. या उज्ज्वल यशाबद्दल कुमार प्रियरंजनचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन !

## टेबल टेनिस पटु अभिजित

घाटकोपर, मुंबई येथील प्रतिष्ठानचे सदस्य, हितगुजचे लेखक **गजानन भास्कर यांचा १४ वर्षाचा नातू अभिजित अशोक** (पृ. ४२७) याने नंदकिशोर सिंग स्मृती आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धेत (सीनियर) जेतेपदाचा मान मिळवला. अभिजितने याशिवाय रोटरी घाटकोपर यांच्या व दादासाहेब केतकर मेमोरियल टुर्नामेंट या आंतरशालेय स्पर्धांतहि प्रथम पारितोषिके मिळवली आहेत. कुमार अभिजितचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन व यापुढे राष्ट्रपातळीपर्यंत असे यश मिळो अशा शुभेच्छा !

## कै. बाळकृष्ण विश्वनाथ मराठे



**पन्नासाव्या स्मृतिदिना-निमित्त *आदरांजली***

**(चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९२०)**

*ती. बाबा,*

*तुमच्या निधनानंतर (१९४८) ती. आईने जिद्दीने, अपार कष्ट घेऊन ती. कै. लक्ष्मीबाई सोहनी आणि ती. कै. सुमित्राबाई सोहनी, बेळगांव यांच्या मार्गदर्शन व मदतीमुळे आम्हाला माणूस म्हणून जगायला लायक घडविले. म्हणून आज आम्ही गोव्यांत कोणीतरी आहो. हे आमचे यश बघायला तुम्ही हवे होता.*

| | | |
|---|---|---|
| **कालिदास बाळकृष्ण** | **सौ. कमला वा. ताम्हणकर** | **शशिकांत बाळकृष्ण** |
| एम्. ए., एम्. एड्. | बी. ए. | बी. एस्सी |
| **ढवळी गोवा.** | **पेडणे, गोवा.** | **धारबांदोडा, गोवा.** |

## महिला पुरोहित नीला मराठे - नाबाद ६१

घाटकोपर मुंबई येथील सभासद **सदाशिव गोविंद (पृ. ८७) यांच्या पत्नी सौ. नीला (वत्सला)** यांनी १.१२.१९९७ रोजी ६१ वर्षे पूर्ण केली. त्यांच्या आगळयावेगळया 'पौरोहित्य' कामाचा परिचय हितगुज सप्टेंबर १९९४ मध्ये वाचल्याचे अनेकांच्या स्मरणात असेलच. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने त्यांची एक सखी सौ. विजयालक्ष्मी आगाशे यांनी केलेले हे वर्णन तर पहा : खरंच का तू एकसष्ट वर्ष पूर्ण केलीस? कधी धीरगंभीर पतीवर्णनात रंगून जातेस कधी मुलगा-नातू-सुनेच्या कौतुकांत मग्न असतेस. भजनाच्या सख्यांमध्ये मिस्किलपणे हसत असतेस. स्वतः अनुभवलेले विनोदी किस्से सांगत असतेस. ......खरंच का तू एकसष्ट वर्ष पूर्ण केलीस ?

मराठे प्रतिष्ठानतर्फे एकच प्रार्थना - जीवेत शरदः शतम् ।

## 'माई'ची आगळी वेगळी एकाहत्तरी

**प्रतिष्ठानचे ठाणे (कळवा) येथील सदस्य सुरेश वामन (पृ. ७६२) यांच्या मातोश्री 'माई'च्या** एकाहत्तरीचा सोहळा २०.२.९८ रोजी नव्या-जुन्यांचा संगम साधून वेगळ्या पद्धतीने चाकोरीबाहेर जाऊन वाडा तालुक्यातील विक्रमगड येथील 'नेचर ट्रेल' येथे साजरा करण्यात आला. गुरुजींनाहि तिथे नेऊन धार्मिक विधी आणि पिकनिक अशा नव्या जुन्याचा संगम साधण्यात आला.

'माई'च्या वयाच्या सतराव्या वर्षी माईचे वडील निवर्तले. जिल्हा परिषदेच्या शाळेत नोकरी करून त्यांनी पाठचे दोन भाऊ व दोन बहिणी यांचे शिक्षण, लग्नकार्ये केली. वयाच्या चाळीशीनंतर त्या S.S.C. झाल्या. २० वर्षे मुख्याध्यापक पदावर राहून १९८६ मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्या. नोकरी करतानाच संसार सांभाळून प्रौढ शिक्षण, नेत्र शिबिरे, नागरी संरक्षण, रेडक्रॉस सोसायटी अशी समाजसेवेची कामेहि त्या करीत. १९८३ साली त्यांना जिल्हा परिषदेकडून आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला.

'माई'च्या जिद्दीची आश्चर्यकारक गोष्ट त्यांच्या मुलाकडून समजली. १९५३ मध्ये दिवस भरलेले असताना त्या प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षेसाठी कल्याणहून मुंबईला गेल्या. परीक्षा देऊन घरी आल्या आणि दोन तासांनी त्यांना पहिला मुलगा झाला.

अशा या जिद्दी, कर्तबगार माईंना दीर्घायुरारोग्य लाभो आणि सहस्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रमहि अशाच आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा होवो अशी त्यांच्या कुटुंबीयाप्रमाणेच मराठे परिवारीयांचीही ईश्वरचरणी प्रार्थना.

Marathe Pratishthan

## मालविका, मंजिरी आणि भाऊ मराठ्यांची कुसुमाग्रज काव्यसंध्या


मंजिरी मराठे


भाऊ मराठे


मालविका मराठे

२७ फेब्रुवारी हा कवी कुसुमाग्रज यांचा वाढदिवस. तो 'मराठी दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो.

२७.२.१९९८ रोजी मराठी दिनानिमित्त मॅजेस्टिक एजन्सीज तर्फे दादर, मुंबई येथे **सदानंद विष्णू (पृ. ५०७) उर्फ भाऊ मराठे** यांनी दूरदर्शनवरील **वृत्तनिवेदिका मालविका (पृ. ३२७ - रणजित अनंत यांची पत्नी) आणि मंजिरी (पृ. ३९२) मराठे** यांच्यासह कुसुमाग्रज काव्यसंध्या हा कार्यक्रम सादर केला. माहितीपूर्ण, खुसखुशीत निवेदन आणि कुसुमाग्रजांच्या कवितांचे भावदर्शी काव्यवाचन यामुळे दीड तास चाललेला हा कार्यक्रम इतक्या 'लवकर' का संपला अशी रुखरुख श्रोत्यांना लावून गेला. ☆☆☆

## भरतनाट्यनिपुण नेहा



प्रतिष्ठानचे **अमेरिकेतील सभासद मुकुंद विनायक (पृ. ७०) यांची कन्या कु. नेहा** हिने भरतनाट्यम् शैलीमधील आपल्या नृत्य शिक्षणाचा एक टप्पा नुकताच पूर्ण केला. तिच्या नृत्यशिक्षणाची पूर्तता म्हणून योजलेला 'अरंगेत्रम' समारंभ एका स्थानिक नाट्यगृहात नोव्हेंबर १९९७ मध्ये साजरा झाला. 'भरतनाट्यम्'मधील दाक्षिणात्य कृतींशिवाय 'राम जन्मला ग सखी राम जन्मला' या मराठी गीतावर आधारलेल्या नृत्यामधून तिने रामजन्मानंतर अयोध्यावासीयांना झालेल्या अत्यानंदाचा प्रत्यय आणून दिला. आपली नृत्यसाधना यापुढेही चालू ठेवण्याचा तिचा विचार आहे. प्रतिष्ठानतर्फे तिला शुभेच्छा.

## कुर्यात बटोर्मंगलम्

प्रतिष्ठानचे अध्यक्ष **सुरेशभाऊ यांचा नातू प्रणव यशवंत (पृ. ३९९)** याचा व्रतबंध दादर येथे ६ फेब्रुवारी १९९८ रोजी करण्यात आला. या समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे पुणेरी पगडी-धोतर अशा पोषाखांत इतस्ततः वावरणारे बटु व त्याचे भाऊ हा साऱ्या आप्तस्वकीयांच्या कौतुकाचा विषय झाला होता.

## नांदा सौख्य भरे

१. **ठाणे येथील सभासद श्रीनिवास केशव** (पृ. २८८) **यांचा मुलगा सुयश याचा विवाह** शास्त्री हॉल मुंबई येथील श्रीकांत प. वैद्य यांची मुलगी प्रिया हिचेबरोबर ८ नोव्हेंबर १९९७ रोजी दादर, मुंबई येथे संपन्न झाला.

२. ठाणे येथील **सभासद पुरुषोत्तम वासुदेव (पृ. ४२७) यांची कनिष्ठ कन्या अनघा** हिचा विवाह मुलुंड, मुंबई येथील दत्तप्रसाद अनंत प्रधान यांचा मुलगा हृषीकेश याच्याशी मुलुंड येथे दि. ६.१२.१९९७ रोजी संपन्न झाला.

३. बडोदे येतील सभासद **रघुवीर विष्णुपंत (पृ. ४२२) यांचा मुलगा सुधन्वा** याचा विवाह डॉ. अनिल काशिनाथ कवठेकर यांची कन्या सुरभि हिच्याशी बडोदे येथे दि. २१.१२.१९९७ रोजी साजरा झाला.

४. हेदुलवाडी, पो. मळेवाड, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **रमाकांत सदाशिव (पृ. ४४९) यांची कन्या तारामती उर्फ मनीषा** हिचा विवाह मधुकर केशव गोगटे, काळसेवाडी, ता. देवगड यांच्याशी दि.१२.२.१९९८ रोजी सावंतवाडी येथे संपन्न झाला.

**सर्व नवविवाहित वधूवरांस मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.**

## सहवेदना

१. **ठाणे येथील कुलबांधव सुहास शंकर** (पृ. २७७) यांचे ४.१२.१९९७ रोजी दुःखद निधन झाले. ते ५३ वर्षांचे होते. नुकताच त्यांनी ठाणे येथे आनंद डायनिंग हॉल सुरू केला होता.

२. **डोंबिवली जि. ठाणे येथील कुलबांधव चिंतामणी पांडुरंग** (पृ. २७४) यांचे दि. ३१.१२.१९९७ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी हार्ट ॲटॅक ने अचानक निधन झाले. ते सोलापूर मधील लक्ष्मी विष्णू मिल मधून निवृत्त झाले होते.

३. **सांगली येथील कुलबांधव विश्वनाथ पुरुषोत्तम उर्फ रमेश** (पृ. ४५८) यांचे १०.१.१९९८ रोजी गुलबर्गा येथे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. उगार शुगर वर्क्स्‌च्या सांगली ऑफिसचे व्यवस्थापक म्हणून ते काम पहात होते.

४. **आगाशी, जि. ठाणे येथील कुलबांधव गणेश विश्वनाथ जोशी** (पृ. ७५०) यांचे ३०.१.१९९८ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. बालक मंदिर, ब्राह्मण सभा, ग्राहक संघ अशा अनेक सामाजिक संस्थांचे ते एक तळमळीचे क्रियाशील कार्यकर्ते होते



५. मराठे प्रतिष्ठानचे **स्थापने पासूनचे आधारस्तंभ** आणि पुणे शाखेचे सुरवातीचे अध्यक्ष व कायमचे सल्लागार **श्रीधर परशुराम**

Marathe Pratishthan

**तथा बापुसाहेब** (पृ. ९८) यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराने २२.२.१९९८ रोजी निधन झाले. २६ जानेवारी १९९८ रोजी प्रतिष्ठानचा वर्धापनदिन सोहळा त्यांच्याच अध्यक्षतेखाली पुण्यांत साजरा करण्यांत आला होता.

१९७१ मध्ये पोलिस कमिशनर म्हणून निवृत्त झाल्यानंतर ते पुण्यात स्थायिक झाले होते. त्यांच्या निधनामुळे पुण्यातल्या अनेक सामाजिक व सांस्कृतिक संस्थांचा मित्र व मार्गदर्शक हरपला आहे.

प्रतिष्ठानच्या ऑक्टोबर १९९७ मध्ये रत्नागिरी येथे झालेल्या ६ व्या मराठे परिवार संमेलनात बापुसाहेबांचा खास सत्कार करण्यात आला होता. 'हितगुज'च्या डिसेंबर अंकात मराठे प्रतिष्ठानच्या या 'भीष्म पितामहा'बद्दल लिहिलेला परिचयलेख ही त्यांना 'श्रद्धांजली' ठरावी हा दैवदुर्विलासच नव्हे काय ?

६. **मराठे प्रतिष्ठानच्या सभासद मालतीबाई दत्तात्रय (पृ. ३५८)** यांचे रविवार ११ जानेवारी १९९८ रोजी अचानक निधन झाले. शैक्षणिक संस्थांना मदत करण्याचा आपल्या पतीचा वारसा त्यांच्यामागून मालतीबाईंनी जपला होता. पतीच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त (१७.९.१९९५) त्यांनी प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला रु. २५,००० देणगी दिल्याचे वाचकांना स्मरत असेलच. (पहा हितगुज सप्टेंबर १९९५).

मृत्यूपूर्वी आठच दिवस हितगुजचा रत्नागिरी अधिवेशन विशेषांक देण्यासाठी त्यांच्याकडे गेलो असता सुमारे तासभर बसवून घेऊन त्यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची चौकशी केली. नुकतीच त्यांनी कर्जतच्या शाळेला अद्ययावत प्रयोगशाळेसाठी दिलेल्या देणगीची हकिगत सांगितली. तसेच मुंबईत शिक्षणासाठी सोय हवी असणाऱ्या एका कुलबांधवाच्या हितगुजमधील जाहिराती संबंधातहि चौकशी केली. ''मी घरात एकटीच असते. त्यामुळे कोणा गरजू विद्यार्थी वा विद्यार्थिनींची माझ्याकडे राहण्याची सोय होऊ शकेल - अगदी विनामूल्य,'' असेहि त्यांनी आश्वासन दिले.

त्यांचा हा देकार स्वीकारण्याची संधी प्रतिष्ठानला मिळायची नव्हती हेच खरे !

**वरील सर्व कुटुंबीयांच्या दु:खांत मराठे परिवार सहभागी आहे.**

☆☆☆

# आदर्श माता पारितोषिकाच्या मानकरी श्रीमती राधाबाई बाळकृष्ण

**- सौ. कमला वासुदेव ताम्हणकर, पेडणे, गोवा.**

'न मातुः परदैवतम्' ही उक्ती सार्थ ठरवणारी माझी आई 'आदर्श' आहे यात शंकाच नाही.

१९२६ मध्ये सावर्डे - काकोडे, गोवा येथे माझ्या आईचा जन्म झाला. आई सहा बहिणीत सगळ्यात लहान. भाऊ नव्हताच. लहानपणीच पितृछत्राला पारखी झालेली. वडील कीर्तनकार होते, त्यामुळे आर्थिक ओढाताण. आजीने कष्ट करून कुटुंबाचे पोषण केले, म्हणजेच लग्न झालेल्या वडील बहिणी व त्यांचा परिवार हाच सुखदुःखात, अडीअडचणीत आधार. सगळ्यात लहान असल्यामुळे घरातील बारीकसारीक काम करत, बाजारहाट करत. त्या ५०-६० वर्षांपूर्वीच्या काळात आई चौथी पास झाली. पण ती बारा वर्षांची होते तोच आईचा आधारही गेला. आईचे जीवनच दुःखमय! सुख आले, आले म्हणताना हुलकावण्या द्यायचे.

वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी कु. यमुना बर्वे, सौ. राधा मराठे झाली. (पृ. ५४१) वडील सांगलीला जाऊन ज्योतिष व संस्कृत शिकून आलेले. एकत्र कुटुंब, बागायतीचे उत्पन्न, पण वडिलधाऱ्यांची अरेरावी त्यामुळे आई-वडिलांची कुचंबणा व्हायची. शेवटी कंटाळून वडील बेळगावाजवळ 'बिडी' येथे पाटलाकडे कारकून म्हणून राहिले. आता आईचा खरा संसार सुरू झाला. माहेरी लहान म्हणून तशी जबाबदारी नव्हती पण आता अचानक आलेली सांसारिक जबाबदारी तिनं जिद्दीनं व चिकाटीनं पेलली. आम्हा तीन भावंडाचा जन्म झाला. दोघे भाऊ व मी मधली. संसार खरोखरच सुखाचा म्हणावा तसा चालला होता.

आणि ह्या सुखी संसाराला दृष्ट लागली. मुदतीचा ताप काळ म्हणून आला व १९४८ साली आम्हाला वडिलांविना पोरकं करून गेला. आईचे वय फक्त २२-२३ आणि तीन मुले वय वर्षे ३, ५ व १० महिने. आईवर आभाळच कोसळले. दीर येऊन गावी घेऊन गेले. पण बागायतीचे विभागलेले उत्पन्न, रेशनचे तुटपुंजे धान्य, परिवाराचा, जाणत्यांचा असहकार, पदरी लहान मुले. पण आईनं धीर खचू दिला नाही.

मुलांना जर नीट वाढवायचं असेल तर इथे राहून भागणार नाही; म्हणून बहिणीच्या नवऱ्याला घेऊन आमची आई बेळगावला आली. तिथे लक्ष्मीबाई सोहनी, समाजसेविका प्रेमळ आत्याच्या रूपात उभ्या राहिल्या. त्यांनी 'सर्वतोपरी मदत करेन पण सांगितलेलं ऐकलं पाहिजे,'अशी प्रेमळ तंबी दिली. व्ह. फा. झालं पाहिजे, त्यासाठी शाळेत उपस्थिती पाहिजे. एका बाजूने आर्थिक स्थिती सांभाळण्यासाठी पेपरमिंटच्या कारखान्यात ५ तास नोकरी, तर घरी शिवण. लहान तीन मुलं, धाकटा फक्त १० महिन्यांचा. कधीकधी त्याला तसच रडत ठेवून, मन घट्ट करून तिला शिक्षण व नोकरीसाठी घराबाहेर पडावे लागे. पण तिनं ते खंबीरपणे केलं.

अशा ह्या धावपळीत तिनं आम्हा मुलांकडे कधीच दुर्लक्ष होऊ दिलं नाही. अर्धपोटी राहिलं तरी चालेल पण दुसऱ्यांपुढे हात पसरून कधीच मिंध व्हायचं नाही, ही शिकवण तिनं आम्हाला त्या लहान वयातच दिली. दुसरं लग्न कर म्हणून सांगणाऱ्या लोकांना तिनं सांगितलं, मला वैधव्य भोगावं लागतं हा माझ्या नशीबाचा दोष. त्याची शिक्षा मी मुलांना देणार नाही. अशा रीतीने अर्धपोटी राहून, पण

## आदर्श माता पारितोषिकाचे निकष

१. आपली मुले सुसंस्कृत, सुशिक्षित, सदाचारी आणि स्वावलंबी व्हावी म्हणून जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न.

२. संसार सुखी व समाधानी होण्यासाठी दाखवलेले सामंजस्य/सोशिकपणा, केलेले समझोते आणि गरजेच्या वेळी अर्थार्जनातील सहभाग.

३. सामाजिक, सांस्कृतिक, सार्वजनिक क्षेत्रांतील कार्य/कर्तृत्व.

४. पारितोषिक पात्र माता सासरची अथवा माहेरची मराठे परिवारांतली असावी.



Marathe Pratishthan

## 'ग.विं'ची कर्तबगार आई

आदर्श माता पारितोषिकाचे प्रायोजक **गणेश विनायक (पृ. ११५) यांची आई कै. आनंदीबाई (दुर्गाबाई)** हीहि एक आदर्श माता होती. अवघ्या ५ वर्षाच्या 'ग.विं'ना घेऊन ती मुंबईत आली आणि गिरगावांत सुग्रास भोजनालय व गृहवस्तुभांडार चालवून त्यांना उत्तम शिक्षण दिले. ते चार्टर्ड अकाउंटंट झाले. पुढे मॉस्कोत राहून रशियन भाषेचा डिप्लोमा मिळवल्यानंतर मुंबईच्या आय्. आय्. टी. मध्ये रशियन भाषेचे प्राध्यापक म्हणून काम केले.

आज मी जो काही आहे तो केवळ आईमुळे अशी 'ग. विं'ची श्रद्धा आहे. आपल्या आईचे स्मरण ठेवण्यासाठी आदर्श माता पारितोषिक देण्याची कल्पना साकार करणारे सुसंस्कारी व कर्तृत्ववान 'ग.विं' हा त्यांची आई 'आदर्श माता' असल्याचा पुरावाच नव्हे काय?

**- संपादक**

परिस्थितीला शरण न जाता, त्या कष्टमय जीवनात ती व्ह. फा. पास झाली.

कानडी भाषेमुळे बेळगावात नोकरी मिळणे शक्य नव्हते. गोव्यात पोर्तुगीज राजवट असल्याने तोही मार्ग बंद होता. नोकरी मिळणे तर अतिआवश्यक होते. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात शिक्षिका पाहिजे म्हणून आलेल्या जाहिरातीप्रमाणे केलेल्या अर्जाला, ताबडतोब नोकरीवर रुजू व्हा असे उत्तर आलं.

परका प्रदेश, अनोळखी लोक, आई भांबावली. पण ज्यांनी देवरूपाने आईला स्वावलंबी बनवण्याचे ठरवले, त्या आत्यांनी माहिती काढली, बरोबर येऊन गावातील लोकांची ओळख करून दिली. 'तुमच्या ह्या बहिणीला सामावून घ्या, परिस्थितीनं व मुलांसाठी काहीतरी करण्याच्या जिद्दीनं तिला इथे आणून पोचवलय. तिला सहकार्य करणं हे तुमच्या हातात आहे'' असे सांगितले. कसल्याही फळाची अपेक्षा न करता, नात्यागोत्याची नसताना आमच्या आत्यानं केलेली मदतच आम्हाला इथवर आणू शकली. तिला माझा प्रणाम.

नवीन गाव, ३-४ महिने पगार नाही, जवळची पुंजीही संपत आलेली; उद्या काय ह्या प्रश्नाने झोप नाही. ह्याचा परिणाम तिनं शिकवण्यावर होऊ दिला नाही, सदैव मन लावून शिकवणे व मुलांना सर्वतोपरी सहाय्य करणे ह्यामुळे ती विद्यार्थीप्रिय शिक्षिका व सर्वांचीच 'बाई' झाली.

शेजारचे लोक न मागता, न सांगता, परिस्थिती ओळखून मदत करीत. पण आईनं आपणहून कधीच काही मागितलं नाही, असेल त्याच्यात दिवस गोड करणं तिलाच जमायचं.

मग शिक्षणाधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे, सगळी कागदपत्रे, मुख्याध्यापिकेने तत्परतेने पूर्ण केली व पगार वेळेवर सरू झाला आणि आर्थिक विवंचना दूर झाली.

आई-वडील अशी दोन्ही कर्तव्ये निभावताना गोड बोलून, आपुलकीने, तर कधी कठोर बनून तिनं आमच्यात त्याग, अन्यायाची चीड, स्वावलंबन व कोणाकडूनही वाईट न म्हणून घ्यायची शिकवण दिली. ह्या वेळी सामाजिक रूढी, परंपरा, अंधविश्वास ह्याचाही त्रास तिला सहन करावा लागला. विधवा बायकांनी बाजार करणे, तिच्या हातचं खाणं, चहा पिणं निषिद्ध मानलं जाई व आमच्या घरात दुसरं कुणीच वडील माणूस नसल्याने हे सर्व तिलाच करावं लागे. अशावेळी तिला शेजार-पाजाऱ्यांच्या बायका नाव ठेवीत. पण जेव्हा त्यांना परिस्थितीची जाणीव करून देण्यात तिला यश आलं तेव्हा त्याच बायका आपण येऊन हवं नको बघू लागल्या. असं कोणाशीही भांडणतंटा न करता पण समजावून तिनं लोकांचा विश्वास व प्रेम मिळवलं. अशा प्रकारच्या तरुण, एकाकी आयुष्यात अनेक अडचणी सहन करून तिनं त्यावर मात केली. ते प्रसंग लिहायचेच झाले तर त्याच एक पुस्तक होईल.

तिच्या जिद्दीने व कष्टाने आज आम्ही तीन्ही भावंडे पदवीधर होऊन आपापल्या संसारात सुखी आहोत. माझे दोन्ही भाऊ उच्चाधिकारी आहेत. आम्हा तीन्ही भावंडात तिनं बिंबवलेल्या स्नेहाचा धागा पक्का आहे .आम्हा तिघांची मुलेही आज कुणी पदवीधर, उच्चपदवीधर होत आहेत. आपल्या कलागुणांनी, कविता, कथा, कलाकुसर, क्रीडा नैपुण्याने आपल्या आजीला आनंदित करीत आहेत. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलेली माझी आई अजूनही स्वाभिमानाने जीवन घालवते आहे.

येथपर्यंतचा जीवनपट त्या परमेश्वराने यशस्वी रीतीने आणण्यात व कष्टांना, अडचणींना दूर करण्यात मदत केली त्याची कृतज्ञता व्यक्त करताना तिने एक लहानसे पंचायतनाचे मंदिर बांधले आहे, त्या देवांची पूजाअर्चा करण्यात व देशातील वेगवेगळया तीर्थस्थळांना भेटी देण्यात तिचा वेळ सार्थकी लागतो.

तुमच्या आदर्श मातेच्या कल्पना वा निकष काहीही असोत पण ४०-५० वर्षांपूर्वी एक तरुण विधवा, आपल्या तीन लहान-लहान मुलांसहित एका अनोळखी प्रदेशात स्वतःच्या पायावर उभी राहून आपलं स्वतंत्र विश्व निर्माण करते ती माझ्या दृष्टीनं खरोखरच आदर्श आहे. तिचे आपल्या कर्मभूमीशी असलेले ऋणानुबंध इतके दृढ आहेत की आजही निवृत्तीनंतर ती जेव्हा तिथे जाते तेव्हा तिथल्या तिच्या सहकाऱ्यांची, स्नेह्यांची मुलं सुद्धा तिला 'बाई' म्हणून आपलंसं करतात.

आम्हाला 'माणूस' म्हणून जगण्याची शिदोरी देणाऱ्या आमच्या आईला उदंड आयुष्य लाभो हीच आम्हा भावंडांची ईश्वरचरणी प्रार्थना. ☆☆☆

### कृतज्ञता

*वर्षभराच्या बाळावर हृदयशस्त्रक्रिया! कल्पनाच असह्य होते दुर्दैवाने असा प्रसंग पुण्यातील संतोष मधुकर मराठे यांच्यावर आला. कुलबांधवांच्या सद्भावनांचे प्रतीक म्हणून प्रतिष्ठानतर्फे त्यांना रु. १०,००० अर्थसहाय्यहि देण्यात आले. त्यांच्याकडून आलेले आभार पत्र - संपादक*

छोटासा इवलासा आमचा रोहन
ठरले त्याच्या हृदयाचे ऑपरेशन

ऑपरेशन आणि तेहि हृदयाचे
ठोके चुकले आमच्या काळजाचे

देवाची केली प्रार्थना, मनाचा केला निर्धार
आधुनिक तंत्रज्ञानाने ऑपरेशन पडले पार

कुणी दिलं रक्त, कुणी आशीर्वाद, कुणी आधार
आपल्या सर्वांचे आमच्याकडून मनःपूर्वक आभार

**- संतोष व शुभदा**



Marathe Pratishthan

# ५० वर्षांपूर्वी संततिप्रतिबंधक साधने वापरणारी आदर्श पत्नी व आदर्श माता सौ. निशा भालचंद्र मराठे

**- सौ. अर्चना अरुण कुलकर्णी, कोल्हापूर.**

माझी आई सौ. निशा भालचंद्र मराठे (पृ. ४२७). माझ्या आईचे व वडिलांचे बालपण अत्यंत गरीबीत गेले. बरीच भावंडे असलेल्या माझ्या आईवडिलांनी आर्थिक ओढाताणीत मुलांची होणारी आबाळ स्वतः अनुभवली होती. आपल्याला एका मुलीवरच संतुष्ट राहिले पाहिजे. आणखी मुलांना जन्म देऊन त्यांना संकटात टाकायचे नाही. असा दोघांनीही संकल्प केला.

माझ्या आईचे लग्न इंग्रजी ५वीत (आत्ताची ९ वी) असताना झाले. वडिलांना पगार फक्त २३ रुपये, घरचे केर, धुणी, भांडी, स्वयंपाक वगैरे कामे करून, शाळेत चालत जावे लागे. आर्थिक ओढाताण असल्यामुळे लग्नांत दिलेल्या (माहेरच्या) ४ सोन्याच्या बांगड्या, तीन वर्षांत मोडाव्या लागल्या. ४ थी सोन्याची बांगडी विकून मॅट्रिकचा फॉर्म भरला.

आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी, मॅट्रिक नंतर माझ्या आईने माध्यमिक शाळेत नोकरी धरली. तिची शाळा सर्वच बाजूने आदर्श अशी होती. नियम अतिशय कडक होते. त्या शाळेत १६ वर्षे कधीही रजा न घेता नोकरी केली त्यामुळे ती आदर्श शिक्षिका ठरून सर्वांच्या कौतुकास पात्र ठरली. नोकरी करत करत तिने हिन्दीच्या सनद (शिक्षक) पर्यंतच्या ५ परीक्षा व S.T.C. ची ही परीक्षा दिला.

सौ. आईने मला अगदी मुलासारखे वाढवले. अभ्यासाच्या दृष्टीने परीक्षांच्या वेळी रात्री जागून, माझ्या आईने माझ्याबरोबर बसून लिहिण्यावाचण्यात जातीने मदत केली. पहाटे लवकर उठून घरातील सर्व कामे आटोपून, माझे नृत्यशिक्षण करण्यासाठी तिला तब्बल दोन तास, नोकरीच्या वेळेआधी घराबाहेर पडावे लागे. तिने हे करत असताना, माझ्या वडिलांना लागणारे सकस व गरमागरम जेवण हसतमुखाने वाढण्यात एक दिवस सुद्धा कसूर केली नाही. आमच्या घरांत आईवडिलांची कुरबूर, असामंजस्य ही अवस्था मी कधीही पाहिली नाही.

पन्नास वर्षांपूर्वी 'कुटुंब नियोजन' हा शब्द उच्चारणे हे सुद्धा लोकांना पाप वाटत असे. त्या काळात, र. धों. कर्वे व शकुंतला परांजपे यांना भेटून कुटुंबनियोजनाची माहिती घेऊन माझ्या आईने ते तत्व अंमलात आणले. तिच्या संपर्कात येणाऱ्या बोहारणी, मोलकरणी, झोपडपट्टीवाल्या बायका यांना नियोजनाची उपयुक्तता पटवून देऊन, साधने वापरण्यासाठी तयार केले व ५-१० बायकांची, पोरांच्या जंजाळाला कंटाळलेल्यांची मुक्तता केली.

दुधवाल्या, लोणीवाल्या व कामवाल्या बायकांना ती घरगुती औषधे देऊन त्यांच्या व त्यांच्या मुलांच्या आजारीपणात मदत करत असते. तिने होमिओपॅथिचा अभ्यास करून बऱ्याच औषधांची माहिती करून घेतली आहे. त्या शिवाय कुणाचे डोळ्याचे ऑपरेशन, कुणाचे दात काढणे, कुणाची डोकेदुखी, कुणाची पिशवी काढणे, अशा वेळप्रसंगी त्या बायकांना डॉक्टरांच्याकडे घेऊन जाणे, आपल्या ओळखीचा फायदा करुन देऊन, त्यांना ऑपरेशनच्यासाठी धीर देऊन उद्युक्त करणे, ऑपरेशन नंतर २-३ दिवस त्यांचे पथ्यपाणी पहाणे अशा गोष्टी, माझी आई सतत करत आलेली आहे.

सुना, मुले विचारीत नाहीत, नवरा सांभाळत नाही, नवऱ्याने सोडले आहे अशा बायकांना जेवू-खाऊ घालणे, त्यांचे आजारावर उपचार करणे, त्यांना कपडालत्ता देणे, त्यांना हर तऱ्हेची मदत करणे, हे आजही तिचे ब्रीद होऊन राहिले आहे. आसपासच्या अशा रंजल्या गांजलेल्या बायकांची ती आईच बनली आहे. ज्याला ज्या वेळी ज्या वस्तूची गरज आहे त्याला त्यावेळी ती देणे ही खरी ईश्वरसेवा (जनसेवा) आहे हे तत्व तिने स्वतःच्या कृतीने माझ्या मनावर ठसविले आहे.

आजही वयाच्या ७३ व्या वर्षी, शरीर थकले असले तरी, पहाटे ४ वाजता उठवून, माझ्या मुलांचा अभ्यास ती करवून घेत असते. त्यांच्या परीक्षेच्या वेळी त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे अवघड काम सातत्याने करत आहे.

२४ वर्षे खंडित झालेले माझे नृत्याचे शिक्षण पुन्हा सुरू करुन 'नृत्य विशारद'चे माझे स्वप्न उत्कृष्ट तऱ्हेने साकार करण्यात (हितगुज डिसेंबर १९९६ पृ. १५ पहा) माझ्या आईचा सिंहाचा वाटा आहे. माझ्या डोळ्यासमोर माझ्या मातेचा आदर्श सतत दीपस्तंभासारखा उभा आहे. एका सत्प्रवृत्त मातेची बरोबरी १०० शिक्षकांनाही करता येणार नाही.

☆☆☆

## असा त्याग - अशी माणुसकी

निवृत्त पोलीस कमिशनर कै. श्री. प. तथा बापुसाहेब मराठे यांचा मुलगा मनोहर त्याच्या मित्राबरोबर कॅनडात नोकरी करून शिकत होता. एका मोटार अपघातात दोघांचाही मृत्यू झाला.

विमा कंपनीने बापुसाहेबांना सांत्वनाची तार पाठवून कळविले 'बासष्ट हजार डॉलर विम्यापोटी कै. मनोहरला देणे आहे. डी. डी. पाठवीत आहे.'

कोणालाही लोभ व्हावा अशीच ही रक्कम. पण त्यागी, निस्पृह बापुसाहेबांनी विमा कंपनीला धन्यवादपूर्वक कळविले - ''मनोहरच्या निधनाने आम्ही दुःखी आहोतच. मनोहरचा विवाह झाला नव्हता. पण याच अपघातात मृत्युमुखी पडलेला त्याचा मित्र विवाहित होता. त्याच्या निराधार दुर्दैवी पत्नीला व अपत्याला ती रक्कम द्यावी.''

Marathe Pratishthan

# नृत्यालंकार सौ. मंजिरी देव

**- गजानन भास्कर (पृ. ४२७)**, घाटकोपर, मंबई



सुमारे दोन महिन्यांपूर्वी महाराष्ट्र शासनाने विविध ग्रथांना पुरस्कार जाहीर केले. त्यामधे ''नृत्य-सौरभ'' या मंजिरी देव लिखित आगळ्या - वेगळ्या मराठी पुस्तकास इ.स. १९९३-९४ चा विशेष पुरस्कार मिळाला. ३५० पानांच्या या पुस्तकामध्ये कथ्थक-नृत्य शैलीच्या विकासाचा सर्वांगाने विचार केला आहे. नृत्य शिक्षण घेणाऱ्या व निरनिराळ्या नृत्य परीक्षांना बसणाऱ्यांना हा ग्रंथ म्हणजे मोठा आधार आहे. गेली २० वर्षे कथ्थक नृत्याच्या क्षेत्रात कलाकार, शिक्षक, पेपर-सेटर, परीक्षक, संस्थाचालक अश्या विविध स्तरांवर त्या कार्य करीत आहेत.

सौ. मंजिरी देव या पुर्वाश्रमीच्या कोल्हापूरच्या **कु. मृणालिनी गोपाळ मराठे (पृ. ४२८)**. ''मधुबनमें राधिका नाचे रे'' या 'कोहिनूर' सिनेमामधील नृत्याची हुबेहुब नक्कल करणाऱ्या चिमुरड्या मृणालिनीचे नृत्य-गुण ओळखून तिच्या आईने गुरु बदरीनाथ कुलकर्णी यांच्याकडे तिला नृत्याचे शास्त्रशुध्द शिक्षण घेण्याकरिता पाठविले. तिथे दहा वर्षे शिक्षण घेतल्यावर तिने प्रसिध्द नृत्यशिक्षिका आशा जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गांधर्व महाविद्यालयाच्या ''नृत्यविशारद'' व ''नृत्यालंकार'' या पदव्या मिळविल्या. त्यानंतर प्रसिध्द नर्तक कै. गोपीकृष्ण यांच्याकडे कथ्थक नृत्याचे उच्चशिक्षण घेतले. तिने मराठी विषय घेऊन M.A ची पदवीही प्रथम श्रेणीमध्ये मिळविली आहे.

मराठी रंगभूमीवर तिने अनेक भूमिका करून बक्षिसे व प्रशस्तीपत्र मिळविली. तरीसुद्धा नृत्यकलेचा ध्यास असल्याने कथ्थक नृत्यशिक्षणाला वाहून घेतले आहे. इ.स. १९७६ साली तिने ठाण्याला ''गणेश नृत्य कलामंदिर'' या नृत्यशिक्षण देणाऱ्या संस्थेची स्थापना केली. गेल्या २२ वर्षात शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींनी त्यांच्याकडे कथ्थकचे शिक्षण घेतले आहे. महाराष्ट्रात तिचे ठिकठिकाणी कथ्थक नृत्याचे जाहीर कार्यक्रम झाले आहेत. नवदुर्गा, जटायू-मोक्ष, अष्टनायिका या स्वतःच्या नृत्यरचना ती विशेष कौशल्याने सादर करते. मार्च ९३ मध्ये साहित्य कला परिषदेने आयोजित केलेल्या ६२ व्या नृत्य व संगीत महोत्सवात पं. गोपीकृष्ण यांच्याबरोबर त्यांची विद्यार्थिनी म्हणून आपले कथ्थक नृत्य सादर करण्याचा बहुमान तिला मिळाला.

तिचे पति श्री. श्रीराम देव हे व्यवसायाने इंजिनियर असले तरी कला व नाट्य प्रेमी आहेत. ते ठाण्यातील रंगभूमी चळवळीशी संबंधित असून नाटकातूनही कामे करतात. त्यांचा मोठा मुलगा चि. मुकुंदराज देव हा घराण्याची कलापरंपरा पुढे चालवीत आहे. तो एक नामांकित तबलावादक आहे. पं. जसराज, डॉ. प्रभा अत्रे, परवीन सुलताना इ. ख्यातनाम गायकांना तबला-साथ करतो.

सौ. मंजिरीचा नृत्यावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविण्याचा विचार आहे. सौ. मंजिरी आगे बढो! सर्व मराठे परिवाराच्या शुभेच्छा तुझ्या मागे आहेत.

☆☆☆

---

# अशी माझी पुतणी - सौ. अरुंधती अशोक वाड

**- सौ. सुमन (सुहासिनी) नारायण, (पृ. १८), कल्याण.**

***'आदर्श माता' पारितोषिकाच्या निमित्ताने सिडकोचे अध्यक्ष नारायणराव मराठे यांच्या पत्नीने त्यांच्या पुतणीच्या कर्तृत्वाची करून दिलेली ही ओळख - संक्षिप्त स्वरूपात - संपादक***

मी मुलाखत घेण्यासाठी गेले त्यावेळी माझा मनोदय सांगताच उषा चटकन् म्हणाली, 'काकू, एक तर प्रश्नोत्तरात वेळ जातो, विचारांची साखळी तुटते. त्यापेक्षा मीच माझी माहिती शिस्तवार देते.' प्रश्न आठवण्याचं आणि योग्य ठिकाणी विचारण्याचं ओझं हलकं झालं. उषा बोलत राहिली. मी लिहीत राहिले.

''माझं नाव सौ. अरुंधती अशोक वाड. पूर्वाश्रमीची तुमची उषा दत्तात्रय मराठे (प.१७). जन्म कल्याणातील प्रसिद्ध मराठे वाड्यात. आजी, आजोबा, सहा काका, तीन आत्या, आई, वडील व एक लहान बहीण असा माहेरचा गोतावळा. आजोबा कै. परशुरामपंत मराठे हिंदुमहासभेचे कार्यकर्ते. कै. स्वातंत्र्यवीर सावरकर त्यांचे स्फूर्तीस्थान होते. सामाजिक सेवा त्यांनी जीवनव्रत म्हणून स्वीकारले होते.''

''माझा जन्म १२ मे १९४९. वयाच्या बारा वर्षापासून घरातील कामाची जबाबदारी हळुहळु वाढत गेली. पण बालपण मी जपून ठेवलं. हतूतू, खो खो मनसोक्त खेळले. मंगळागौर जागविण्याचे खेळ. भोंडल्याची गाणी अजूनही मनांत ताजीतवानी आहेत. पण मला खरी आवड आहे लहान मुलांना सांभाळण्याची. त्यांना खेळवताना माझं मन हरपून जातं. या जन्मजात आवडीमुळेच मी आत्तापर्यंत त्याच क्षेत्रात रमले. बालवाडी हेच माझं कार्यक्षेत्र मी पसंत केलं.''

''माझं शालेय शिक्षण एस्. एस्. सी. १९६६ मध्ये अशोक वाड या मनासारख्या जोडीदाराबरोबर माझा प्रीतिविवाह झाला. प्रीतिविवाह असला तरी विवाह सोहळा अगदी जुन्या पद्धतीप्रमाणे वरात गाजवीत झाला. मला सख्खे सासू-सासरे नव्हते. पण चुलत, आते, मावस नात्यातील मंडळींनी माझं सासर समृद्ध होतं. नाही म्हणायला मला एक सख्खी नणंद होती. आमच्या लग्नांत तिनंच पुढाकार घेतला होता. सुरवातीला नणंदेकडेच



Marathe Pratishthan

राहिलो. नंतर परिस्थितीवर मात करून स्वतंत्र जागा घेतली.''

''लहानपणापासूनच आईनी कामाची आवड निर्माण केली होती. वादविवाद करायचेच नाहीत, भांडणांना थारा द्यायचा नाही, मनाला पटलं नाही तर गप्प बसायचं, हा वडिलांचा उपदेश मी अजूनही पाळते.''

''१९६६ मध्ये अतुलचा जन्म झाला. वाडांचा वंश अंकुरित झाला. केवढं कौतुक झालं माझं ! त्याचं भवितव्य घडविण्यात अहोरात्र श्रम घ्यायचे हे मी ठरवून टाकलं. एस्. एस्. सी. पर्यंत मी स्वतः त्याचा अभ्यास घेत होते. त्याने तांत्रिक विषय निवडला आणि तो बॉम्बे डाईंगमध्ये नोकरीला लागला. दुसरा मुलगा अवधूत. जन्म १९७०. लहानपणापासून त्याला नाट्यक्षेत्राची अतिशय आवड. त्याच्याबरोबर लहान होऊन मी त्याचा छंद जोपासला. त्याला नाटकातले उतारे हावभावासह शिकवले. एका वरच्या जागेवर तो इंजिनियर म्हणून काम करतो. आमचं तिसरं अपत्य अश्विनी. जन्म १९७४. लहानपणापासून तिला क्रिकेटची आवड. आवड म्हणजे वेडच. आता क्रिकेट हा प्रधानतः पुरुषांचा खेळ. पण मी तिचं मन ओळखलं. तिला तिचा छंद पुरा करण्यासाठी तिच्या पाठीशी उभी राहिले. कल्याणसारख्या काहीशा दूर ठिकाणी राहून तिनं क्रिकेटची तपश्चर्या केली. राष्ट्रीय पातळीवर ती क्रिकेट खेळू लागली. कु. अश्विनी वाड हे नाव आपण कदाचित् वर्तमानपत्रात वाचले असेल. आजही ती कदाचित् भारतीय संघातून खेळली असती. पण लग्नानंतर हा छंद जोपासणं हे सर्वस्वी सासरच्या माणसांवर अवलंबून असतं. नाही का?''

''बेताच्या आर्थिक परिस्थितीत या मुलांना मोठं करणं. आपल्या मनासारखं मोठं करणं मोठं कठीण होऊन बसलं. तेव्हा उशीरा का होईना पण आपण संसाराला आर्थिक हातभार लावला पाहिजे हा निर्णय मी घेतला. मी काय केलं यापेक्षा मी काय केलं नाही हाच प्रश्न सयुक्तिक ठरावा, इतक्या खटपटी लटपटी मी केल्या. मुलांना सांभाळणे, पापड कुरड्या विकणे, शर्टपीस, ब्लाऊजपीस विकणे हे सर्व मार्ग हाताळल्यावर शिकविणे हेच माझं कार्यक्षेत्र आहे याची मला खात्री पटली. १९८४ मध्ये पूर्व शालेय शिक्षक प्रशिक्षण (बालवाडी) अभ्यासक्रम पुरा केला. १९८६ साली कल्याण येथील सुभेदारवाडा शाळेत बालवाडी शिक्षिकेची नोकरी मिळाली. आणि या नोकरीच्या अनुभवाच्या आधारावर स. वा. जोशी हायस्कूल येथे पूर्व प्राथमिक विभागात मुख्याध्यापक म्हणून माझी नेमणूक झाली.''

''आता एक तपानंतर मागे वळून पाहताना माझ्या बालशिक्षण क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीची पावती म्हणून पुढील गोष्टींचा उल्लेख करावा लागेल :

''जनरल एज्युकेशन संस्थेच्या पातळीवर होणाऱ्या पूर्वप्राथमिक शाळेतली विद्यार्थ्यांच्या नाट्यस्पर्धेत सतत ५ वर्षे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून देण्यात मोठा वाटा; महिला विकास २००१ या प्रकल्पाचे सभासदत्व; महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे सभासदत्व; भारतीय शिक्षण मंडळातर्फे राज्यस्तरावर श्रावण प्रकल्प लेखाला द्वितीय पारितोषिक; विवेकानंद प्रकल्प/कन्याकुमारी यांच्या डोंबिवली शाखेतर्फे आदर्शशिक्षक पुरस्कार; ज. ए. सोसायटी शिक्षक संघातर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार; ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेतर्फे पारितोषिक.''

''काही दिवस पावसाचे, काही उन्हाचे. हा ऊन पावसाचा खेळ त्रयस्थ वृत्तीने पाहणे हेच संसाराचे मर्म. संसाराचा रथ दोन चाकावर चालतो. त्यांची गती, त्यांची दिशा समान हवी. माझ्या भाग्याने माझे यजमान शांत आणि सोशिक स्वभावाचे आहेत. त्यांचा अध्यात्माकडे कल आहे. ते श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) चे निस्सिम भक्त आहेत. ते पदयात्रेचे भोक्ते आहेत. आम्ही उभयतानी अमरनाथ यात्रा, चारी धाम यात्रा, काशीयात्रा, नेपाळ पशुपतीनाथ यात्रा, वैष्णवीदेवी यात्रा केल्या आहेत. केदारनाथ यात्रा पायी केली आहे. केदारनाथ यात्रेत बूट पुरात वाहून गेल्यामुळे सात कि. मी. बर्फातून प्रवास अनवाणी करावा लागला. श्री स्वामींच्या कृपेने व केदारनाथांच्या आशीर्वादाने माझा पुनर्जन्मच झाला.''

''ही माझी जीवनगाथा. हे पुराण सांगण्याचे कारण इतर गृहिणींनी धीर न सोडताना सुसंस्कारित कुटुंबाचा आदर्श ठेवावा हेच आहे. मला माझे यजमान, मुलगे, मुली, सुना, जावई, इतर आप्तेष्ट यांचा हातभार आहे. आई-वडील आणि परमेश्वर यांचे आशीर्वाद आहेतच.'' ☆☆☆

## फोनवरून देणगी

- ट्रिंग ट्रिंग. लक्ष्मणराव आहेत का ?
- बोलतोय. आपण कोण बोलताय ?
- मी **बोरिवलीहून अरुण गणेश** (पृ. १०१) बोलतोय. मी पत्नीसह तीन-चार महिन्यांसाठी अमेरिकेत ह्यूस्टनला माझी मुलगी मेधा बापट हिच्याकडे जाण्याच्या गडबडीत आहे. मार्च एन्ड आला. इन्कम टॅक्स हे जसे सरकारी देणे देतो तसेच प्रतिष्ठानला दरमहा रु. १०० प्रमाणे देणगी देणे हे मी सामाजिक ऋण मानतो. रु. १२००चा चेक कुठे पाठवू?
- पाठवा प्रभादेवीला. प्रतिष्ठानच्या कार्यालयात. मराठे उद्योग भवनात. पाकिटावर सुरेशभाऊ मराठे यांचे नाव लिहा म्हणजे झाले.
- ठीक. प्रतिष्ठानचे काम छान चाललेय. हितगुजमधून नियमित कळते. प्रतिष्ठानच्या कार्यात प्रत्यक्ष भाग नाही घेता येत. खारीचा वाटा म्हणून थोडासा हातभार - प्रतिष्ठानच्या खर्चासाठी.
- ओ. के. धन्यवाद. **आपण एक चांगले उदाहरण घालून देताय सर्वच कुलबांधवांना!**

## निवडणूक

निवडायचे म्हणजे
चांगल्यातून वाईट बाहेर काढायचे
पण सगळीच भेसळ असेल तर
नक्की चांगले कोणाला ठरवायचे ?
पूर्वी निवडणूक पंचवार्षिक असायची
आता ती अगदी 'वार्षिक परीक्षा' झाली
करोडो रुपयांचा होतो चुराडा
मध्यमवर्गीयांचा सर्व बाजूने कोंडमारा ।

**- सौ. स्वाती ग. अभ्यंकर**, (पृ. १५५ विजय अनंत यांची मुलगी), पुणे.

Marathe Pratishthan

# कर्तृत्ववान, संस्कारशील, कर्तव्यदक्ष माता - सौ. प्रतिभा प्रभाकर (पृ. १०१)

**- सौ. प्रज्ञा प्रशांत पिटकर, नागपूर**

आमची आई एका मध्यमवर्गीय कुटुंबातली. ती एकंदर ९ भावंडं. त्यामुळ फक्त ११वी मॅट्रीक होऊ शकली. डॉक्टर व्हायची इच्छा असून शिकता आलं नाही. पण अतिशय ध्येयवादी. तिच्या आईच्या शेवटच्या बाळंतपणाच्यावेळी खरं तर ही हाताशी आलेली मुलगी. पण तिच्या आईनी म्हणजे आमच्या आजीनी डी. एड. च्या ट्रेनिंगला जायला परवानगी दिली, 'भूक नसली तरी शिदोरी असावी' म्हणून. पण तीच शिदोरी पुढे वेळ आल्यावर उघडली व शिक्षकाचा पेशा पत्करला. तसेच शिवण व भरतकाम करायलाही शिकली. हळूहळू घरच करून शिवणक्लासमध्ये नोकरी केली. नंतर शिवणाचा पण साईड बिझीनेस केला. तिनं शिवलेले बाळंतविड्याचे कपडे परदेशात सुद्धा गेले.

स्वतःच्या वागण्यातून आम्हाला चांगले वागण्याचा, बघण्याचा चष्मा आपसूकच प्रदान केला. सगळ्यांशी वागणं आदरानं. मोठ्यांचा शब्द तिनं कायम पाळला. त्यामुळे आमच्यावर पण तेच संस्कार झाले. तिच्यातली सहनशीलता, संयम, मेहनत, कर्तव्य, भावना हे गुण तिनं कळत-नकळत आमच्या मनात रुजवले ते ह्या वाक्यानं - 'माणसं जोडायला वर्षानुवर्ष तपश्चर्या करावी लागते पण तोडण्याचं काम फक्त एका शब्दानं होतं'

स्वतःच्या पायावर उभं राहून, स्वतःची शिवणकला जोपासून आम्हालाही आपापल्या पायांवर उभं केलं. आमच्यातली आवड पाहून मला 'संगीत विशारद' व भावाला 'तबला विशारद' केलं. माझा मोठा भाऊ BARC त इंजिनीयर आहे, मी MSc. पूर्ण करुन L.I.C. त नोकरी करते व लहान बहीण B.Sc. B.Ed. करून शिक्षिका झाली आहे. तिनं कुठलेच विचार आमच्यावर लादले नाहीत; प्रत्येक बाबतीत नाण्याच्या दोन्ही बाजू समजावून सांगितल्या. त्यामुळे आम्ही स्वतंत्र विचार करायला शिकलो.

लहान असताना आम्हा भावंडांना प्रत्येकाला ती वेगवेगळा वेळ द्यायची. सकाळी शाळेत जायची त्यामुळे आमची भेट एकदम संध्याकाळी व्हायची. पण आल्यावर ती आमच्याशी गप्पागोष्टी करायची. अभ्यासाबद्दल, शाळेतल्या मित्रमैत्रिणींबद्दल चौकसतेनं विचारायची. आमच्यासारखं लहान होऊन आमच्यात समरस व्हायची. त्यामुळे आमची मनं तिनं लहानपणापासून काबीज केली. कुठलीही गोष्ट कधी एकदा आईला सांगतो असं व्हायचं. आमचं कधी भांडण झालं, कुणाशी नाही पटलं, कोणी बोललं, कधी चुकलं तरी आईला विश्वासात घेऊन मुक्तपणे सांगू शकायचो. तिला आमचं सगळं माहीत असायचं. अशी आमची ती विश्वासू मैत्रीण बनली.

मोठ्या भावाला अमरावतीला इंजिनियरींगला ॲडमिशन मिळाली त्यावेळी आई जरा चिंतेत होती. कारण तेच वय चांगल्या-वाईट संगती लागायचं असतं. ती त्याला म्हणाली, 'पाण्यात राहून माशाशी वैर करायचं नाही! पण पाणी अंगाला चिकटू द्यायचं नाही.' त्यावेळी तो म्हणाला 'इतकी वर्ष केलेले संस्कार वाया जायचे नाहीत.' आईने आमच्यावर खूप कामं लादली नाहीत. फक्त जाणीव दिली आणि संस्कारच असे करून घडवलंय की कुणालाही कुठेही जायची वेळ आली तरीही तो तिथे तसा adjust होईल. त्याचप्रमाणे मीही माझ्या सासरी एकत्र कुटुंबात सहज सामावून गेले.

अशी आमची आई - कर्तृत्ववान, संस्कारशील, कर्तव्यदक्ष, 'आदर्श माता'!

☆☆☆


CONTACT LENS CLINIC

**MRS. KUNDA GANATRA**

Orthokeratologist & Contact Lens Specialist.
B.Sc. (Bom.), F.A.O., C.L.R.G., F.A.C.L.P. (Lond.), FNERF (USA).

***We prescribe the correct contact lenses that take care of your eyes.***

- ★ Gas Permeable Contact Lenses,
- ★ Conventional Soft Lenses
- ★ Conventional Soft Cosmetic Lenses,
- ★ Disposable Contact Lenses

Monthly disposable lenses from well-known brands like Focus and Toric (soft) from CIBA, Softens 66 from B & L and Vistavue from Johnson and Johnson.

**And fortnightly disposables : Acuvue from Johnson and Johnson**

Also Soft bifocals, artificial eyes and cosmetic shell and spectacles with wide choice of frames.

*Come for the total eye care, the scientific way, at :*

**Mumbai :** 183, Girgaum road, Gaiwadi, Mumbai 400 004.
Tel: 3820409, 3868909, Fax : 3868230
**Pune :** 9, Gangadhar Chambers, Near Vijay Talkies, 314, Narayan Peth, Pune 411 030.
Tel.: 457031 (Thursday Closed). Timing : 9.00 am to 7.00 pm


## एकमेकां साह्य करूं - चष्म्याचा नंबर मोफत

साधारण दोन वर्षापूर्वी पुण्याचे मराठे कुलबांधवांचे सम्मेलनात सामील व्हायला गेले. कुणाचीही प्रत्यक्ष फारशी ओळख नव्हती; पण संधी सोडायची नाही असं ठरवून पुण्यात आले.

बाहेरच सुंदर रांगोळीने स्वागत केले आणि आत आल्यावर हळूहळू ओळखी झाल्या. बरेच दिवसांनी माहेरी आल्याचा आनंद झाला. कार्यक्रमही छान होते. खरोखरच दिवस सुंदररीत्या पार पडला.

तेव्हापासून आपल्या बांधवांसाठी काहीतरी करावंसं वाटत होतं. म्हणून मराठे कुटुंबियांसाठी मोफत डोळ्याचा नंबर काढून द्यायचे ठरवले आहे. तसेच Visionaids या आमच्या विभागाकडून चष्मा घेतला तर त्यातही १० टक्के सूट देण्याचे ठरविले आहे. **- सौ. कुंदा रो. गणात्रा** (डॉ. शंकर हरि, पृ. १३२, नेत्रस्पर्शी भिंगांचे भारतातील आद्यप्रवर्तक यांची कन्या.)

***(कुंदाताई, आपल्या या देकाराबद्दल सर्व कुलबांधवांतर्फे आभार-संपादक)***




Marathe Pratishthan

# प्रतिभेची जपणूक (नवनिर्मितीक्षमता)

- सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), मानसतज्ञ, पुणे. फोन : ४५६२४०

आपल्या मुलांनी शिकावं आणि मोठं व्हावं ही इच्छा प्रत्येक पालकाचीच असते. परंतु बऱ्याच पालकांच्या मुलांच्या विकासाबद्दलच्या कल्पना मात्र साचेबंद असतात. मुलांनी मोठं व्हायचं म्हणजे परीक्षेत चांगले गुण मिळवून डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावं असा पालकांचा ध्यास असल्यामुळे मुलाला प्राथमिक शाळेत घातल्यापासून त्याच्या मागे अभ्यासाचा दट्ट्या लावला जातो.

परंतु पालकांनी या साच्याच्या पलिकडे जाऊन मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक असते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक व आत्मिक अशा सर्व दिशांनी समृद्ध आणि विकसित आयुष्य मुलांना लाभावं यासाठी विकासाची पायाभरणी करण्याची जबाबदारी पालकांची असते. विकास करणे म्हणजे दगडावर छिन्नीने घाव घालून आपल्याला हवी तशी मूर्ती घडविणे नव्हे तर कळीला खतपाणी घालून, तिच्याभोवती उबदार वातावरण ठेवून तिच्या गतीनं उमलू द्यायला मदत करणे. याचं भान ठेवून विकास साधण्याचा प्रयत्न केला तर मुलांमधील प्रतिभेची हळूहळू जाणीव होऊ लागते व त्यादृष्टीने प्रतिभेचा विकास करणे सुलभ जाते.

प्रतिभाशक्ती म्हणजे साचेबंदपणाला विरोध! जिज्ञासेतून प्रतिभा जन्म घेत असते. त्यामुळे मुलांनी चौकसपणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पालकांनी समाधानकारकरीत्या दिली म्हणजे मुलांच्या प्रतिभेचा विकास होण्यास मदत होऊ शकते. त्याचप्रमाणे मुलांना स्वतंत्र विचार करायला आणि स्वतंत्रपणे निर्णय घ्यायला शिकवले पाहिजे. मुलांना निरीक्षण करण्याची सवय लावली पाहिजे. प्रश्न विचारण्याची संधी दिली पाहिजे. विविध प्रकारच्या कृती करून पाहण्यासाठी प्रत्यक्ष अनुभव घेऊ दिला पाहिजे. या दृष्टीने पालकांनी प्रयत्न केल्यास मुलांच्या प्रतिभेचा विकास होताना दिसून येतो.

मुलांची कल्पनाशक्ती खूप प्रखर आणि तीव्र असते. तिच्या ठिणग्या क्षणोक्षणी उडत असतात. चिकणमातीपासून निरनिराळ्या वस्तू बनवणे, विविध प्रकारची चित्रे काढून ती रंगवणे, वाळूची चित्रे तयार करणे, कागदाच्या विविध वस्तू बनवणे अशा हस्तव्यवसायातील विविध कृती करताना मुले रममाण झालेली दिसतात ती प्रतिभेमुळेच! या हस्तव्यवसायातून मुलांनी निर्माण केलेल्या नवीन कृतींचे, पालकांनी कौतुक केले म्हणजे त्यांना आपोआपच प्रोत्साहन मिळते.

या कल्पनाशक्तीच्या आधारेच मुले एका वस्तूचे विविध उपयोग करू शकतात. उदा. आजोबांची काठी घेऊन लहान मूल त्या काठीचा कधी घोडा बनवते तर क्षणार्धात तीच काठी बंदूक म्हणून वापरली जाते. काठीचा उपयोग कधी चेंडू अडविण्यासाठी बॅट म्हणून केला जातो तर कधी आजोबांची नक्कल करतांना टेकत टेकत चालण्यासाठी काठीचा उपयोग होतो.

मुलांच्या प्रतिभेला घरातही खूप संधी मिळू शकते. गौरी-गणपतीसमोर आरास करणे, दिवाळीचा किल्ला व आकाशकंदील करतांना विविध कल्पना लढवून त्या प्रत्यक्षात आणणे, संक्रांत, दिवाळी किंवा नववर्षाची भेटकार्डे मुलाने स्वतः तयार करून नातेवाईकांना पाठवणे यासाठी मुलांना प्रोत्साहन दिले तर त्याच्या प्रतिभेचा विकास होऊन त्याला मानसिक समाधानही भरपूर मिळते. याव्यतिरिक्त मुलांना आकृत्या, अंक, भाषा व व्यावहारिक कोडी सोडवणे, विविध प्रयोग करून पाहणेही खूप आवडते. त्यामुळे या संदर्भातील साहित्य उपलब्ध करून देऊन मुलांना उत्तेजन दिले तर प्रतिभेची वृद्धी होण्यास खूपच मदत होऊ शकते.

या सर्वांबरोबरच प्रतिभेचा विकास होण्यासाठी मुलाने निर्भय असणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजे बऱ्याच गोष्टी त्याला एकट्याने करू द्याव्या. आपली माया, काळजी, सतत मदत करण्याची वृत्ती, अती लाड किंवा अती धाक न दाखवता त्याला स्वावलंबी होण्यासाठी प्रवृत्त करावे.

अमूक एक गोष्ट मुलाला जमणार नाही, झेपणार नाही, समजणार नाही हे पालकांनी ठरवू नये. मुले कधीकधी आपल्याला वाटतात त्यापेक्षा जास्त हुषार असतात. प्रयत्न प्रमाद (Trial & Error) पद्धतीने मुले चांगले शिकू शकतात. फक्त विविध प्रयोग करून पाहतांना त्यांच्या कृती शरीराला घातक नाहीत ना एवढे पाहिले म्हणजे पुरे!

घरात जेव्हा काही सण, समारंभ, उत्सव, कार्यक्रम, वाढदिवस यासारखे प्रसंग साजरे करतांना त्या कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन व प्रत्यक्ष कृती करण्यात मुलांचा सहभाग पालकांनी अवश्य घ्यावा. यातून मुलांच्या प्रतिभेला चालना मिळू शकते.

अधूनमधून मुलासमोर काही काल्पनिक प्रसंग गप्पांच्या ओघात ठेवावे व त्या प्रसंगावर विचार करण्यासाठी मुलाला स्फूर्ती द्यावी. उदा. गर्दीत रस्ता चुकला, बाजारातून आणायला सांगितलेली एखादी वस्तू वाटेत पडली व वाया गेली, पैसे हरवले, एखाद्या व्यक्तीला चुकीचा निरोप दिला यासारखे काल्पनिक प्रसंग घडले तर त्यात तो कसा वागेल? व त्याने कसे वागायला हवे? हे त्याचे त्याला ठरवू द्या. अनुभवातून तर्कद्वारा त्याला अनुमानाकडे जाण्यासाठी पालकांनी अवश्य संधी द्यावी.

मुलांची निरीक्षणशक्ती वाढवण्यासाठी पालकांनी मुलांना आपल्याबरोबर फिरायला, बागेत, बाजारात, प्रवासाला, नातेवाईकांच्या घरी आणि विविध समारंभ व सार्वजनिक उत्सव पाहण्यासाठी अवश्य घेऊन जावे व तेथे निरीक्षण करण्याची सवय लावावी. मुलांच्या शाळा व शिबिरांना आवर्जून पाठवावे. विविध प्रकारची खेळणी हाताळायला व खेळायला द्यावी आणि वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

असे विविध प्रकारचे प्रयत्न पालकांनी केले तर मुलांच्या प्रतिभेचा निश्चितच विकास होऊ शकेल.

☆☆☆



Marathe Pratishthan

हार्दिक शुभेच्छा!!!

**मराठे मेरिट क्लासेस (पुणे)**

संचालक प्रो. मराठे सर (बी.टेक)

**१० वी, ९ वी (रेग्युलर बॅचेस) १९९८-९९**

विषय : Maths, Science, English (H.L. & L.L.)

**१०वी** : सर्व बॅचेस १ मे ९८ पासूनच सुरू

**९वी** : सर्व बॅचेस १० जून ९८ पासून सुरू

- **सायन्स प्रॅक्टिकल्स व टेस्ट सीरीज सहित.**
- **मेरिट लिस्टसाठी खास स्कॉलर्स बॅचेस**

**संपर्क** : ४३४, नारायण पेठ, उमाशंकर अपार्टमेंट्स्, पत्र्यामारुती जवळ, पुणे-३०.

✆ : ४८४२११

**भरघोस यशाची परंपरा!**
**लिमिटेड सीटस्! त्वरित ॲडमिशन्स घ्या!**

## या अंकात

१. **सेवा व्यवसाय** ........................................ पृ.१
प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ

२. **हितगुज कार्यालयात धो धो पाऊस - अभिनंदनांचा!** पृ.२

३. **१९व्या वर्धापनदिन समारंभाचा वृतांत** .............. पृ.५
प्रमोद विष्णु, पुणे

४. **आदर्श माता पारितोषिकाच्या मानकरी श्रीमती राधाबाई बाळकृष्ण** ............................ पृ.९
सौ. कमला वासुदेव ताम्हणकर, गोवा.

५. **५० वर्षांपूर्वी संततिप्रतिबंधक साधने वापरणारी आदर्श पत्नी व आदर्श माता सौ. निशा भालचंद्र मराठे** ... पृ.११
सौ. अर्चना अरुण कुलकर्णी, कोल्हापूर

६. **नृत्यालंकार सौ. मंजिरी देव** ........................ पृ.१२
गजानन भास्कर, घाटकोपर, मुंबई

७. **अशी माझी पुतणी - सौ. अरुंधती अशोक वाड** .. पृ.१२
सौ. सुमन नारायण मराठे, कल्याण

८. **कर्तृत्ववान, संस्कारशील, कर्तव्यदक्ष माता - सौ. प्रतिभा प्रभाकर** ................................ पृ.१४
सौ. प्रज्ञा प्रशांत पिटकर, नागपूर

९. **प्रतिभेची जपणूक (नवनिर्मितीक्षमता)** ............... पृ.१५
सौ. नीलांबरी रमेश, पुणे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.३), **सभासद वृत्त** (पृ.६) आणि **एकमेकां साह्य करूं** (पृ.१४) ही नेहमीची सदरे.

**बुक पोस्ट**

प्रति

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan